# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०३/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ०३/०३/२०१८ रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. २६/०२/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी १०.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ४. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ६. | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| ८. | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश | सदस्य |
| ९. | श्री. विरानी अनिल रावजीभाई | सदस्य |
| १०. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ११. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| १३. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १४. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १५. | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | सदस्या |
| १६. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

आजच्या सभेसाठी मा. आयुक्त साहेब उपस्थित राहिल्याबद्दल तुमचे मनापासून हार्दिक अभिनंदन. आमच्या स्थायी समितीच्या बैठकीसाठी आयुक्तांची आतुरतेने वाट बघत होतो. कधीतरी आयुक्त येतील. आज आयुक्त साहेब आले सर्व सदस्यांच्या वतीने आपले स्वागत. कधी तरी मिटींगला येत रहा. जेणेकरुन स्थायी समिती कशी चालते आणि तुमचा अनुभव सगळ्यांना मिळेल अशी अपेक्षा करतो. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करा.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापतीसाहेब एक अभिनंदनाचा ठराव आहे. मध्यंतरी त्रिपूरा,मेघालय,नागालॅड मध्ये ज्या निवडणूका पार पाडल्या त्याचा एक कल हाती आला आहे. त्रिपूरामध्ये बीजेपीने जोरदार मूसंडी मारलेली आहे. त्याठिकाणी बीजेपी सरकार स्थापन करते. त्याच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ८० :-**

त्रिपूरा,मेघालय,नागालॅड मध्ये ज्या निवडणूका पार पाडल्या त्याचा एक कल हाती आला आहे. त्रिपूरामध्ये बीजेपीने जोरदार मूसंडी मारलेली आहे. त्याठिकाणी बीजेपी सरकार स्थापन करते. त्याच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ०३/०३/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०९ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे** प्रकरण क्र. ९३, **दि. १५/०१/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे**.

**प्रशांत दळवी :-**

दि. १५/०१/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

पान क्र. ९ ऑक्थोपॉलोजीस्टीककडे बाकी दुरुस्ती रायटींगमध्ये देतो.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९३ :-**

**दि. १५/०१/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे**.

**ठराव क्र. ८१ :-**

दि. १५/०१/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

२ के अन्वये दोन प्रस्ताव आले आहेत. महिला बाल कल्याण रिक्षा घेणार आहोत त्याच्यात १० रिक्षा मागवण्यासाठी मा. आयुक्तांना ५(२)(२) खाली अधिकार देत आहोत आणि सर्व नगरसेवकांचे प्रशिक्षण दौरा असे दोन विषय आहे.

**प्र. नगरसचिव :-**

दोन्ही विषय २ के खाली घेण्यास सभागृहाची मान्यता असल्यामुळे विषय पत्रिकेवरचे विषय संपल्यावर घेण्यात येईल.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४, **सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.** प्रकरण क्र. ९५, **सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे "अग्निशमन अंदाजपत्रकास " मंजूरी मिळणेबाबत .** प्रकरण क्र. ९६, **वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले स न २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.** प्रकरण क्र. ९७, **शिक्षण विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.** प्रकरण क्र. ९८ **परिवहन सेवेचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब आपण स्थायी समिती बजेट सादर केले. आपण जेव्हा महासभेत सादर करु त्यावेळी लेदरच्या अप्रतिम बॅग देऊ.

**जुबेर इनामदार :-**

आज अर्थसंकल्प सादरीकरण झाले आहे. त्यानंतर स्थायी समिती चर्चा सत्र यासंदर्भात आपल्याला आयोजित करायला लागेल.

**मा. सभापती :-**

पूढच्या आठवड्यात २-३ दिवसाची मिटींग लावू आणि सविस्तर चर्चा करु तोपर्यंत तुम्ही अभ्यास करा. आपण चांगले असे मनपाचे बजेट सादर करु तुमच्या सर्वांच्या सहकार्याने.

**मा. आयुक्त :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे **मा. स्थायी समितीचे सभापती श्री. ध्रुवकिशोर पाटील**, उपस्थित सन्माननीय स्थायी समिती सदस्य, कर्मचारी, अधिकारी वर्ग यांचे स्वागत करुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीच्या मान्यतेस सादर करत आहे.

मिरा-भाईंदर शहर हे मुंबई महानगरपालिकेच्या लगत असल्याने या शहराची झपाटयाने वाढ होत आहे. शहराला मुलभूत सेवा सुविधा पुरवित असताना ज्या योजना राबविल्या जात आहेत, त्या दिवसेंदिवस शहराच्या वाढत्या लोकसंख्येला अपु-या पडत आहेत. यासाठी या शहराकरिता नव-नविन योजना राबवाव्या लागत आहेत. अशा योजना महानगरपालिकेच्या मर्यादित उत्पन्नातून पुर्ण करणे शक्य नसल्याने वित्तीय संस्थांकडून कर्ज घेवून योजना मुदतीत पूर्ण कराव्या लागत आहेत.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येला पुरविण्यांत येणाऱ्या मुलभूत सेवा वर्षानुवर्षे तोटयात सुरु आहेत. हा येणारा तोटा लक्षात घेता भविष्यात अशा मुलभूत सेवा सुरळीतपणे पुरविणे कठीण होऊन बसेल. तसेच नव-नविन योजना राबविताना वित्तीय संस्थाकडून घेण्यात आलेले कर्ज याची परतफेड वेळीच होणे आवश्यक आहे. यापुढेही वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारण्यासाठी कर्जाची परतफेड क्षमता राखणे यासाठी यावर्षीच्या अंदाजपत्रकात अल्पशी कर/दर वाढ सुचविण्यांत आलेली आहे. यास मा. महासभेची मंजुरी प्राप्त झालेली आहे. शासनाकडील शहराच्या हिताच्या ज्या नविन योजना राबविल्या जात आहेत. अशा योजनांसाठी महानगरपालिकेचा स्वनिधी लावावा लागतो. तरच शासनाकडून अशा योजना लवकर मंजूर होत असतात. यासाठी या अंदाजपत्रकात नविन योजनासाठी वाढीव उत्पन्नातून तसेच कर्ज रुपाने महानगरपालिकेचा स्वनिधी लावण्यांत आलेला आहे.

**<u>अर्थसंकल्पातील उत्पन्न व खर्चाच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.</u>**

**उत्पन्नाच्या ठळक बाबी**

**(आकडे कोटीत)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मालमत्ता कर | 100.00 | 7. | आरोग्य घनकचरा व्यवस्थापन शुल्क | 12.00 |
| 2. | स्थानिक संस्था कर व अधिभार | 15.00 | 8. | बाजार फी | 7.29 |
| | GST अनुदान | 234.12 | 9. | जाहिरात/होर्डींग्ज/पे अॅण्ड पार्क | 6.16 |
| 3. | पाणीपुरवठा जलनिःसारण व मलनिःसारण | 107.53 | 10. | अनधिकृत बांधकाम शास्ती | 3.25 |
| 4. | इमारत विकास आकार | 50.00 | 11. | परवाना फी | 1.25 |
| 5. | रस्ता नुकसान भरपाई | 32.00 | 12. | शासकिय अनुदान रुपाने | 212.74 |
| 6. | मोकळया जागेवरील कर | 20.00 | 13. | MMRDA कर्ज रुपाने | 244.51 |

**खर्चाच्या ठळक बाबी**

**(आकडे कोटीत)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पाणीपुरवठा जलनिःसारण व मलनिःसारण | 149.71 | 8. | विकास आराखडा/नगररचना विभाग | 16.80 |
| 2. | स्थायी/अस्थायी वेतनातील खर्च | 110.30 | 9. | उद्यान विभाग | 12.78 |
| 3. | आरोग्य- वॉर्डसफाई, नालेसफाई, घनकचरा व्यवस्थापन | 107.50 | 10. | नगरसेवक निधी प्रभाग निधी | 11.00 |
| 4. | सार्वजनिक बांधकाम | 67.00 | 11. | रुग्णालये/दवाखाना | 11.00 |
| 5. | कर्ज परतफेड निधी | 40.00 | 12. | वृक्षप्राधिकरण | 7.02 |
| 6. | विज देयक/विज दुरुस्ती | 28.00 | 13. | आपत्ती व्यवस्थापन | 2.25 |
| 7. | शिक्षण विभाग | 17.29 | | | |

या अंदाजपत्रकातील महत्वाच्या योजनांवरील खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

**(आकडे कोटीत)**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| 1. | अमृत योजना पर्जन्य जलवाहिन्या | 101.31 |
| 2. | अमृत योजना पाणीपुरवठा योजना | 120.00 |
| 3. | सिमेंट रस्ते बांधकाम | 84.00 |
| 4. | प्रधानमंत्री आवास योजना | 78.34 |
| 5. | नविन रस्ते/नविन गटारे | 7.00 |

| | | |
|---|---|---|
| 6. | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचऱ्यावर प्रक्रिया/Bioming करणे | 12.00 |
| 7. | छत्रपती शिवाजी महाराज मुख्य प्रवेशद्वार/कमान/रस्ता रुंदीकरण, सुशोभिकरण करणे | 5.00 |

याशिवाय महानगरपालिकेच्या उत्पन्नातून खालील सेवा सुरळीतपणे सुरु राहण्याकरिता त्यांचे स्वतंत्र अंदाजपत्रकासाठी अनुदान रुपाने "अ" अंदाजपत्रकाचे उत्पन्नातून हस्तांतरण देण्यांत आलेले आहेत.

**(आकडे कोटीत)**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| 1. | वृक्षप्राधिकरण अंदाजपत्रक | 3.60 |
| 2. | परिवहन "ब" अंदाजपत्रक | 13.00 |
| 3. | पाणी व जलनिःसारण "क" अंदाजपत्रक | 42.18 |
| 4. | "P" बजेट | 64.00 |
| 5 | महिला व बालकल्याण | 4.48 |
| 6. | शिक्षण विभाग | 9.66 |
| 7. | अंध अपंग | 1.00 |

महानगरपालिकेची अपेक्षित जमा बाजू लक्षात घेता सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रक रु. ९८९४६.६७ लक्ष जमा व रु. ९८९२६.३२ लक्ष खर्च तसेच **सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक जमा रु. १२१३ कोटी ३२ लक्ष ७६ हजार व खर्च रु.१२१३ कोटी १७ लक्ष ९१ हजार व रु.१४ लक्ष ८५ हजार** शिलकेचे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करण्यांत येत आहे.

सदर अंदाजपत्रकासोबत बांधकाम विभागाकडील मंजूर कामांची यादी जोडण्यांत आलेली आहे. अशी कामे अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहूनच प्राधान्यक्रमाने करावी लागणार आहेत. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५(अ) अन्वये अर्थसहाय्य देवून पुरविण्यांत आलेल्या सेवांबाबतचा सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाचा अहवाल देखील आपणासमोर सादर करण्यांत येत आहे.

मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेते, मा. विरोधीपक्ष नेते, व सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्ग शहरातील विचारवंत, वृत्तपत्रप्रतिनिधी यांचे मला जे सहकार्य लाभत आहे. अशा सर्वांचे मी आभार मानतो. अर्थसंकल्पातील उद्दीष्ट पूर्तीसाठी यापुढे आपले सर्वांचे सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो. धन्यवाद !

**मा. सभापती :-**

साहेब धन्यवाद आपण सादर केलेले २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचा आम्ही नक्कीच विचार करु. आपण ज्या खर्चाच्या ठळक बाजू सुचवल्या आहेत त्याचा आम्ही डिटेलमध्ये विचार विनिमय करुन पुढच्या विकमध्ये बजेटला मंजूरी देऊ.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, **श्री. बाबुराव वाघ , तत्कालीन उपकरनिर्धारक संकलक यांना लावण्यात आलेल्या शास्तीबाबतच्या अपिल अर्जावर विचार विनिमय करणेबाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

श्री. बाबुराव वाघ यांना लावण्यात आलेल्या शास्तीबाबत प्रशासनाने व संबंधित विभागाने सविस्तर अहवाल संपूर्ण माहितीसह मा. स्थायी समितीच्या पुढील सभेत सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ९९ :-**

**श्री. बाबुराव वाघ, तत्कालीन उपकरनिर्धारक संकलक यांना लावण्यात आलेल्या शास्तीबाबतच्या अपिल अर्जावर विचार विनिमय करणेबाबत.**

**ठराव क्र. ८२ :-**

श्री. बाबुराव वाघ यांना लावण्यात आलेल्या शास्तीबाबत प्रशासनाने व संबंधित विभागाने सविस्तर अहवाल संपूर्ण माहितीसह मा. स्थायी समितीच्या पुढील सभेत सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १००, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्ट्रीट लाईट पोल बसविण्याच्या प्रस्तावांना मान्यता देणे.**

**प्रशांत दळवी :-**

अनेक सन्मानीय नगरसेवकांच्या त्यांच्या प्रभागात स्ट्रीट लाईट पोल लावण्याचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. या सर्व सन्मानीय नगरसेवकांचे प्रस्ताव एकत्रित करून पुढील मा. स्थायी समितीत सदरचा प्रस्ताव सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. सर्व नगरसेवक आपआपल्या प्रभागातील स्ट्रीट लाईट पोलचे जे प्रस्ताव राहिले असतील ते जमा करावे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय स्ट्रीट पोलवर दरवर्षी १२०० रु. अंदाजित ठरवले आहेत. खांबित साहेब आपण त्यांना डागडूजीचे पैसे देतो. किती तरी स्ट्रीट लाईट बंद असतात. पालिकेने कर्मचारी लावून किंवा प्रतिनिधीने त्यांना फोन करावा लागतो किंवा सांगावे लागते हे योग्य नाही. आपण त्यांना डागडूजीचे पैसे देतो त्याचे विजबील भरतो. ती रिलायन्स कंपनीची जबाबदारी आहे ते त्यांनी बघायला पाहिजे की स्ट्रीट लाईट चालू आहेत की बंद आहेत. त्यांचे कर्मचारी फिरले पाहिजेत. आम्ही त्यांना सांगायचे आम्ही वारंवार फोन करायचे ते योग्य नाही. ती लोक पोलला कधीच रंगरंगोटी करत नाहीत त्याला कारण काय? शहर स्वच्छ आणि सुदंर असायला पाहिजे. स्ट्रीट लाईटच्या पोलवर रिलायन्सवाले साधा रंग लावत नाही. त्याचे विज बिलाचे देयक अदा करतो त्यांना डागडूजीचे पैसे देतो. मा. आयुक्त महोदय ह्या कामात त्यांचे लक्ष असायला पाहिजे अशी माझी सुचना आहे.

**मा. सभापती :-**

खांबित साहेब माहिती द्या.

**दिपक खांबित :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, आमच्याकडे १३००० स्ट्रीट पोल आहेत. आपल्या शिफारशीनुसार सार्व. स्ट्रिट पोल लावत असते. त्याच्या नियमानुसार त्या स्ट्रीट पोलचे मिटरप्रमाणे जे मिटर आहेत त्या प्रमाणे आपण बिल भरतो. मेन्टेनंसचा प्रत्येक पोलचा दर ठरलेला आहे. १२०० वैगेरे नाही. महिण्याला ३०० पासून सूरू होतो. तो ८००-९०० पर्यत आहे. म्हणजे वॅटसवर ठरलेला असतो. ८० वॅटस १२५,१५० वॅटस आहे. आपण त्यांना महिण्याचे ५० लाख रू. मेन्टेनंसचे भरतो. म्हणजे ४००-५०० च्या मध्ये तो रेट येतो. वर्षाचा सहा कोटी खर्च येतो.

**जुबेर इनामदार :-**

ठीक आहे. डागडूजीची गरज आहे. पण त्या विषयावर त्याची जबाबदारी नाही का?

**दिपक खांबित :-**

त्यांच्याकडून टीम फिरते. आपण ही प्रभागा व्हाईज माणसे ठेवली आहेत. ३-४ दिवसाच्या आत जे पण पोल असतील ते करतात.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आपल्याला माणसे फिरवायची काय गरज आहे. डागडूजीची जबाबदारी त्यांना दिली आहे ना. मग त्यांची जबाबदारी नाही का?

**दिपक खांबित :-**

त्यांची जबाबदारी आहे पण काही नागरीक लोकप्रतिनिधी त्यांच्या ऑफिसपर्यत पोहचू शकत नाहीत. आपली लोक आहेत ती आम्ही रजिस्टरपण दिले आहे.

**जुबेर इनामदार :-**

रिलायन्सला ॲडीशनल फॅसिलीटी दिली आपण आपल कर्मचारी खपवून सहा कोटी देऊनही त्यांचे काम करतो. ही त्यांची जबाबदारी आहे. साहेब त्यांचे एक महिण्याचे बिल थकवा त्यांना पूढचे परमिशन देऊ नका कसे करतात ते बघा.

**दिपक खांबित :-**

आपली सुचना त्यांना कळवू त्यांची एक सभापतीकडे बैठक लावू.

**मा. सभापती :-**

काही महानगरपालिकेमध्ये एलएडी ने लाईटची भरपूर बचत होते. आणि खर्च पण कमी येतो. कॉस्ट पण कमी आहे तर त्याचा विचार का करत नाही.

**दिपक खांबित :-**

खाजगी कंपनीकडून प्रपोजल आले आहे. ई.एस.एल. कंपनी आहे त्यांनी सुध्दा प्रपोजल दिले आहे. त्याच्यावर अभ्यास सुरू आहे. ते आपण महासभेत धोरण ठरवायला घेतो.

**अनिल विराणी :-**

मिरारोड स्टेशन जिस टाईमसे बना है वहॉ लाईट लगा है अंदर सुशोभिकरण के उधर जो लाईट लगा है मैने १०-१५ बार जानकर साहब को फोन किया वहॉ लाईट चालू नही किया।

**दिपक खांबित :-**

उधर दो लगा है कौनसा वाला....

**अनिल विराणी :-**

पोलिस स्टेशन के सामनेवाला बंद है और जो मिरारोड स्टेशन का बनाया सुशोभिकरण उसमे जितने भी लाईट है आजतक बंद है। मैने १० बार फोन किया जानकर साहेब है उनको बूलाओ।

**दिपक खांबित :-**

कराके लेंगे।

**तारा घरत :-**

साहेब जे खोदकाम होते ते पण लगेच बंद केले पाहिजे. रस्ते सगळे खोदले आहेत. रिलायन्सवाला खोदतो आता तर वोडाफोनवाला आला आहे. रस्त्यावरची पॅचींग झाली तर बरे होईल. सगळीकडे खोदलेले आहे.

**प्रकरण क्र. १०० :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्ट्रीट लाईट पोल बसविण्याच्या प्रस्तावांना मान्यता देणे.**

**ठराव क्र. ८३ :-**

अनेक सन्मानीय नगरसेवकांच्या त्यांच्या प्रभागात स्ट्रीट लाईट पोल लावण्याचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. या सर्व सन्मानीय नगरसेवकांचे प्रस्ताव एकत्रित करून पुढील मा. स्थायी समितीत सदरचा प्रस्ताव सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०१, **मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. २०४/०८ स्पेशल इंडस्ट्री झोन येथे १८.०० मी. रुंदीचा डी.पी.रस्ता तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.**

**सुरेश खंण्डेलवाल :-**

सदरचा प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील मा. स्थायी समिती सभेत फेरसादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १०१ :-**

**मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. २०४/०८ स्पेशल इंडस्ट्री झोन येथे १८.०० मी. रुंदीचा डी.पी.रस्ता तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र. ८४ :-**

सदरचा प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील मा. स्थायी समिती सभेत फेरसादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल** **अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र.नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०२, **उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणे कामी मुदतवाढ देण्याबाबत.**

प्रशांत दळवी :-

**मा. महासभा ठराव क्र .12 दि. 28/06/2016 अन्वये उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने,मैदाने,स्म्शानभूमी,चौपाटया, नर्सरी, दुभाजक इ. ठिकाणची दैनंदीन निगा व देखभाल करणेकामी सेवाभावी संस्था, खासगी संस्था, विकासकांना देण्याबाबत दि . 21/07/2016 रोजी दै. यशोभूमी, दै. परशुराम समाचार या वृत्तपत्रात व ऑनलाईन पध्दतीने महानगरपालिका संकेतस्थळावरती जाहिर आवाहन करण्यात आले होते.**

**त्यानुसार (दि. 21/07/2016) रोजीच्या प्रसिध्दी नुसार प्राप्त संस्था नी मासिक मानधन सादर केले असता सदर मासिक मानधनाबाबत मा . निविदा समितीच्या दि . 18/11/2016 रोजीच्या शिफारसीनुसार मा . आयुक्त सो. यांच्या दि. 20/12/2016 रोजीच्या मंजूरी अन्वये वाटाघाटी अंतीचे प्राप्त दर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 73 क नुसार मान्यतेसाठी मा. स्थायी समिती पुढे पाठविण्यात आले.**

**मा. स्थायी समिती सभा दि. 30/12/2016 ठराव क्र.101 अन्वये सदर प्रस्ताव नामंजुर करून देखभाल व दुरुस्तीकामी प्रती चौ.मी. नुसार दर मागविणेत यावे असा ठराव पारित करण्यात आला आहे.**

**तत्पूर्वी मा. कार्यकारी अभियंता यां नी दि. 01/10/2016 व दि. 07/02/2017 रोजी ठेका मजूर पूरवठा करणेकामी मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाचे अवलोकन करण्यात येत आहे.**

**दि. 09/03/2017 रोजी उपरोक्त प्रमाणे दर मागविणे कामी निविदा समितीने व विधि अधिकारी यांनी अटी-शर्ती अंतिम करुन मा. आयुक्त सो. यांच्या दि.20/04/2017 रोजीच्या मान्यतेने दि. 28/04/2017 रोजी दै. मिड-डे, दै. मुंबई तरुण भारत, दै. धावते नवनगर व ऑनलाईन पध्दतीने महानगरपालिका संकेतस्थळावर दि .28/04/2017 ते दि.25/05/2017 या कालावधी करीता जाहिर निविदा सुचना प्रसिध्दी करण्यात आली होती. सदर निविदेचे Technical Bid उघडले असता 06 निविदा प्राप्त झाल्या होत्या.**

**तथापि सदर निविदेतील अटीशर्ती बाबत मा. पदाधिकारी यांनी आक्षेप घेतल्यामुळे व दरम्यान मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक 2017 होती त्यामुळे निविदा प्रसिध्दी करण्यात आली नव्हती . सार्वजनिक निवडणुकी नंतर दि. 06/09/2017 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदान, स्मशाने, व दुभाजके यांची प्रभाग निहाय निगा व देखभाल करणेकामी निविदा मागविण्याकरीता सादर करण्यात आले असता निविदेच्या अटीशर्ती अंतिम करण्यासाठी मा. निविदा समिती पुढे प्रस्ताव ठेवण्याबाबत मा. आयुक्त सो. यांच्या दि. 26/09/2017 रोजीच्या मान्यतेनुसार मा . निविदा समितीची दि . 04/12/2017 रोजी बैठक घेऊन अटीशर्ती निश्चित करून मा. आयुक्त सो. यांच्या दि .15/12/2017 रोजीच्या मान्यतेने दि. 28/12/2017 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या असून सदर निविदेचा कालावधी दि . 30/12/2017 ते दि. 31/01/2018 पर्यंत होती.** सदर निविदेस प्रथम मुदतवाढ दि. **01/02/2018** ते दि. **09/02/2018 रोजी** दु. 1.00 वाजेपर्यंत देण्यात आलेली होती. सदर निविदांचे Technical Bid तपासणी केली असता **प्राप्त निविदाधारक तांत्रिक बाबींची पूर्तता करीत नसल्यामुळे पुन :श्च फेर निविदा मागविणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि. 22/02/2018 रोजी मंजूरी दिलेली आहे.**

मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना जा.क्र.मनपा/वृ.प्रा./मिरारोड/551/2016-17 दि. 07/02/2017 रोजी कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांनी पूढील आदेश होईपर्यंत मजूर पूरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात आलेले आहे. तसेच मे. **गुरूजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा .लि. यांना निविदेतील मंजूर दराप्रमाणे प्रति मजूर / प्रति दिन रु. 875 याप्रमाणे करारनाम्यातील अटी-शर्ती नुसार जा .क्र.मनपा/वृ.प्रा./511/2017-18 दि. 06/01/2018 रोजी सुधारित कार्यादेश देण्यात आलेला असून सदर कामाची मुदत दि. 22/02/2018 पर्यंत आहे.**

**तरी उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागातील दैनंदिन कामाकरिता मजूरांची आवश्यकता पहाता मे . गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना दि. 22/02/2018 ते दि. 30/04/2018 पर्यंत मुदतवाढ देणेस मा . स्थायी समिती सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.**

हसमूख गेहलोतः-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. १०२ :-

**उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणे कामी मुदतवाढ देण्याबाबत.**

ठराव क्र. ८५ :-

**मा. महासभा ठराव क्र .12 दि. 28/06/2016 अन्वये उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने,मैदाने,स्म्शानेभूमी,चौपाटया, नर्सरी, दुभाजक इ. ठिकाणची दैनंदीन निगा व देखभाल करणेकामी सेवाभावी**

**संस्था, खासगी संस्था, विकासकांना देण्याबाबत दि. 21/07/2016 रोजी दै. यशोभूमी, दै. परशुराम समाचार या वृत्तपत्रात व ऑनलाईन पध्दतीने महानगरपालिका संकेतस्थळावरती जाहिर आवाहन करण्यात आले होते.**

**त्यानुसार (दि. 21/07/2016) रोजीच्या प्रसिध्दी नुसार प्राप्त संस्थानी मासिक मानधन सादर केले असता सदर मासिक मानधनाबाबत मा. निविदा समितीच्या दि. 18/11/2016 रोजीच्या शिफारसीनुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि. 20/12/2016 रोजीच्या मंजूरी अन्वये वाटाघाटी अंतीचे प्राप्त दर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 73 क नुसार मान्यतेसाठी मा. स्थायी समिती पुढे पाठविण्यात आले.**

**मा. स्थायी समिती सभा दि. 30/12/2016 ठराव क्र.101 अन्वये सदर प्रस्ताव नामंजुर करून देखभाल व दुरुस्तीकामी प्रती चौ.मी. नुसार दर मागविणेत यावे असा ठराव पारित करण्यात आला आहे.**

**तत्पूर्वी मा. कार्यकारी अभियंता यांनी दि. 01/10/2016 व दि. 07/02/2017 रोजी ठेका मजूर पूरवठा करणेकामी मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाचे अवलोकन करण्यात येत आहे.**

**दि. 09/03/2017 रोजी उपरोक्त प्रमाणे दर मागविणे कामी निविदा समितीने व विधि अधिकारी यांनी अटी-शर्ती अंतिम करुन मा. आयुक्त सो. यांच्या दि.20/04/2017 रोजीच्या मान्यतेने दि. 28/04/2017 रोजी दै. मिड-डे, दै. मुंबई तरुण भारत, दै. धावते नवनगर व ऑनलाईन पध्दतीने महानगरपालिका संकेतस्थळा वर दि.28/04/2017 ते दि.25/05/2017 या कालावधी करीता जाहिर निविदा सुचना प्रसिध्दी करण्यात आली होती. सदर निविदेचे Technical Bid उघडले असता 06 निविदा प्राप्त झाल्या होत्या.**

**तथापि सदर निविदेतील अटीशर्ती बाबत मा. पदाधिकारी यांनी आक्षेप घेतल्यामुळे व द रम्यान मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक 2017 होती त्यामुळे निविदा प्रसिध्दी करण्यात आली नव्हती . सार्वजनिक निवडणुकी नंतर दि. 06/09/2017 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदान, स्मशाने, व दुभाजके यांची प्रभाग निहाय निगा व देखभाल क रणेकामी निविदा मागविण्याकरीता सादर करण्यात आले असता निविदेच्या अटीशर्ती अंतिम करण्यासाठी मा. निविदा समिती पुढे प्रस्ताव ठेवण्याबाबत मा. आयुक्त सो. यांच्या दि. 26/09/2017 रोजीच्या मान्यतेनुसार मा. निविदा समितीची दि. 04/12/2017 रोजी बैठक घेऊन अटीशर्ती निश्चि त करून मा. आयुक्त सो. यांच्या दि.15/12/2017 रोजीच्या मान्यतेने दि. 28/12/2017 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या असून सदर निविदेचा कालावधी दि. 30/12/2017 ते दि. 31/01/2018 पर्यंत होती.** सदर निविदेस प्रथम मुदतवाढ दि. **01/02/2018** ते दि. **09/02/2018 रोजी** दु. 1.00 वाजेपर्यंत देण्यात आलेली होती. सदर निविदांचे Technical Bid तपासणी केली असता **प्राप्त निविदाधारक तांत्रिक बाबींची पूर्तता करीत नसल्यामुळे पुन :श्च फेर निविदा मागविणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि. 22/02/2018 रोजी मंजूरी दिलेली आहे.**

मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना जा.क्र.मनपा/वृ.प्रा./मिरारोड/551/2016-17 दि. 07/02/2017 रोजी कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांनी पूढील आदेश होईपर्यंत मजूर पूरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात आलेले आहे. तसेच मे. **गुरूजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना निविदेतील मंजूर दराप्रमाणे प्रति मजूर / प्रति दिन रु. 875 याप्रमाणे करारनाम्यातील अटी-शर्ती नुसार जा.क्र.मनपा/वृ.प्रा./511/2017-18 दि. 06/01/2018 रोजी सुधारित कार्यादेश देण्यात आलेला असून सदर कामाची मुदत दि. 22/02/2018 पर्यंत आहे.**

**तरी उदयान व वृक्ष प्राधिक रण विभागातील दैनंदिन कामाकरिता मजूरांची आवश्यकता पहाता मे . गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना दि. 22/02/2018 ते दि. 30/04/2018 पर्यंत मुदतवाढ देणेस मा. स्थायी समिती सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०३, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी खेळणी, बँचेस, व्यायामाचे सामान बसविणे तसेच जुनी खेळणी दुरुस्त करणेकामाची मागविण्यात आलेल्या निविदेबाबत.**

**सुरेश खंण्डेलवाल :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी नविन खेळणी, बेंचेस व व्यायामाचे साहित्य पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्त करणे बाबत प्रशासनाने निविदा काढलेली असुन प्रत्येक गार्डनमध्ये किती खेळणी बसविली आहेत, त्यापैकी किती नादुरूस्त आहेत, किती खेळणी नविन बसवायची आहेत, याचा सविस्तर तपशील सादर केला नाही. त्यामुळे निविदा रकमेचा अंदाज काढता येत नाही. निविदेवरील दर हे जास्त

असल्याने सदर निविदा रद्द करून गार्डन मधील सद्या अस्तित्वात असलेली जुनी, नविन व दुरूस्तीची व्यायमाचे साहित्य, खेळणी व बेंचेस यांचे फेर सर्वेक्षण करून फेर निविदा काढण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**तारा घरत :-**

तूटलेली खेळणी रिपेयरिंग होतच नाही. कम्पलेन्ट करून सुध्दा खेळणी रिपेयरिंग होत नाही.

**मा. सभापती :-**

खेळणी किती रिपेयरिंग करायची आहेत. त्याचे सर्वेक्षण करायला पाहिजे. एक्झीस्टिंग गार्डनमध्ये किती खेळणी आहेत. नविन गार्डन किती बनणार आहेत. किती गार्डनमध्ये खेळणी बसवायची आहेत त्याची सविस्तर माहिती सादर केली. नाही. सविस्तर प्रस्ताव सादर करा आणि टेंडर काढा. ठराव मंजूर पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १०३ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी खेळणी, बँचेस, व्यायामाचे सामान बसविणे तसेच जुनी खेळणी दुरुस्त करणेकामाची मागविण्यात आलेल्या निविदेबाबत.**

**ठराव क्र. ८६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी नविन खेळणी, बेंचेस व व्यायामाचे साहित्य पुरवठा करून बसविणे व जुनी खेळणी दुरूस्त करणे बाबत प्रशासनाने निविदा काढलेली असुन प्रत्येक गार्डनमध्ये किती खेळणी बसविली आहेत, त्यापैकी किती नादुरूस्त आहेत, किती खेळणी नविन बसवायची आहेत, याचा सविस्तर तपशील सादर केला नाही. त्यामुळे निविदा रकमेचा अंदाज काढता येत नाही. निविदेवरील दर हे जास्त असल्याने सदर निविदा रद्द करून गार्डन मधील सद्या अस्तित्वात असलेली जुनी, नविन व दुरूस्तीची व्यायमाचे साहित्य, खेळणी व बेंचेस यांचे फेर सर्वेक्षण करून फेर निविदा काढण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०४, **विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत . (पाणी पुरवठा विभाग) (दि. १२/०२/२०१८ (दि.०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८६)**

**प्रशांत दळवी :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **मिरारोड (पू.) मिरागांव येथे हनुमान मंदिर ते दहिसर चेकनाक्यापर्यंत सव्हिर्स रोड वर जलवाहिनी टाकणे. (अंदाजित रक्कम रू. ९२,८०,८००/-)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) **मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ५.९९% कमी दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ६.५०% कमी दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.१६% कमी दराने |
| ३) मे. संदेश डी. बुटाला | अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५९% जास्त दराने |

२) **मिरा एम.आय.डी.सी.जलकुंभ ते मिराधाम सोसायटी पर्यंत जलवाहिनी टाकणे. (अंदाजित रक्कम रू. ४९,८२,९००/-)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) **मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ५.७५% कमी दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ५.७५% कमी दराने** |

२) मे. गणेश डेव्हलपर्स अंदाजपत्रक दरापेक्षा २.२५% कमी दराने

३) मे. संदेश डी. बुटाला अंदाजपत्रक दराने

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व २ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**सुरेश खंण्डेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १०४ :-**

**विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत . (पाणी पुरवठा विभाग ) ( दि. १२/०२/२०१८ (दि.०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८६)**

**ठराव क्र. ८७ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

**१) मिरारोड (पू.) मिरागांव येथे हनुमान मंदिर ते दहिसर चेकनाक्यापर्यंत सर्व्हिस रोड वर जलवाहिनी टाकणे. (अंदाजित रक्कम रू. ९२,८०,८००/-)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ५.९९% कमी दराने<br>वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ६.५०% कमी दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.१६% कमी दराने |
| ३) मे. संदेश डी. बुटाला | अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५९% जास्त दराने |

**२) मिरा एम.आय.डी.सी.जलकुंभ ते मिराधाम सोसायटी पर्यंत जलवाहिनी टाकणे. (अंदाजित रक्कम रू. ४९,८२,९००/-)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ५.७५% कमी दराने<br>वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ५.७५% कमी दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.२५% कमी दराने |
| ३) मे. संदेश डी. बुटाला | अंदाजपत्रक दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व २ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०५, **विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत . (पाणी पुरवठा विभाग) (दि. १२/०२/२०१८ (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८७)**

**रवि व्यास :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भाईंदर (प.) आनंदनगर डोंगरी येथील बोर्जीस यांचे घरापासून उत्तन जलकुंभापर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (**अंदाजित रक्कम रू.** १,११,५४,८००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ५.२५% कमी दराने वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा ५.२५% कमी दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.५०% कमी दराने |
| ३) मे. संदेश डी. बुटाला | अंदाजपत्रक दराने |

२) मिरा एम.आय.डी.सी येथे एम.आय.डी.सी जलकुंभ जंक्शन ते पांडुरंगवाडी येथिल सार्वजनिक शौचालय पर्यंत जलवाहिनी टाकणे. (**अंदाजित रक्कम रू.** ३४,१४,९००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. गणेश डेव्हलपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.२५% कमी दराने वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा २.५०% कमी दराने** |
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ५.८०% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे व अ.क्र. २ च्या कामांकरीता **मे. गणेश डेव्हलपर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**अशोक तिवारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १०५ :-**

**विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत . (पाणी पुरवठा विभाग) (दि. १२/०२/२०१८ (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८७)**

**ठराव क्र. ८८ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भाईंदर (प.) आनंदनगर डोंगरी येथील बोर्जीस यांचे घरापासून उत्तन जलकुंभापर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (**अंदाजित रक्कम रू.** १,११,५४,८००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ५.२५% कमी दराने वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा ५.२५% कमी दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.५०% कमी दराने |
| ३) मे. संदेश डी. बुटाला | अंदाजपत्रक दराने |

२) मिरा एम.आय.डी.सी येथे एम.आय.डी.सी जलकुंभ जंक्शन ते पांडुरंगवाडी येथिल सार्वजनिक शौचालय पर्यंत जलवाहिनी टाकणे. (**अंदाजित रक्कम रू.** ३४,१४,९००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. गणेश डेव्हलपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.२५% कमी दराने वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा २.५०% कमी दराने** |

२) मे. विंध्या ट्रेडर्स अंदाजपत्रक दरापेक्षा ५.८०% जास्त दराने

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे व अ.क्र. २ च्या कामांकरीता **मे. गणेश डेव्हलपर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास** **अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०६, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजक इ. ठिकाणी पाणी देण्याकरीता भाडे तत्वावर टँकर पुरवठा करणेकामी ई -टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने व जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून मागविण्यात आलेल्या फेरनिविदेबाबत. (वार्षिक निविदा)**

**प्रशांत दळवी :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका उदयान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता भाडेतत्वावर टँकर पूरवठा करणेकामी ई-टेंडरिंग प्रणालीव्दारे** N.I.C. (National informatics Centre, Pune) **च्या** https://mahatenders.gov.in **संकेत स्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. (Tender I.D 2017_MBMC_ 251835_1)**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहिर निविदा सुचना<br>(दै. दोपहर का सामना व सा. सुरज प्रकाश)<br>दि. 30/10/2017 | दि. 01/11/2017 ते<br>दि. 20/11/2017 | सदर कालावधीत 04 निविदा प्राप्त झाल्या. |

**सदर कालावधीत प्राप्त 04 निविदा धारकांची Technical Bid तपासणी केली असता 02 निविदाधारक पात्र होत असल्याकारणाने ई -टेंडरिंग प्रणालीव्दारे** N.I.C. (National informatics Centre, Pune) **च्या** https://mahatenders.gov.in **संकेत स्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन जाहिर फेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. (Tender I.D 2017_MBMC_ 259916_1)**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहिर फेर निविदा सुचना<br>(मुंबई तरुण भारत व दै. पुकार)<br>दि. 30/11/2017 | दि. 05/12/2017 ते<br>दि. 14/12/2017 | एक ही निविदा प्राप्त नाही. |
| 2 | प्रथम मुदतवाढ<br>(मुंबई तरुण भारत व दै. पुकार)<br>दि. 15/12/2017 | दि. 15/12/2017 ते<br>दि. 20/12/2017 | एक निविदा प्राप्त |
| 3 | व्दितीय मुदतवाढ<br>(मुंबई तरुण भारत व दै. पुकार)<br>दि. 21/12/2017 | दि. 22/12/2017 ते<br>दि. 27/12/2017 | सदर कालावधीत 03 निविदा प्राप्त झाल्या. |

**सदर कालावधीत प्राप्त 03 निविदा धारकांची Technical Bid तपासणी केली असता निविदाधारक पात्र होत नसल्याकारणाने ई -टेंडरिंग प्रणालीव्दारे** N.I.C. (National informatics Centre, Pune) **च्या** https://mahatenders.gov.in **संकेत स्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन जाहिर फेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. (Tender I.D 2018_MBMC_ 271795_1)**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहिर फेर निविदा सुचना<br>(दै. पुकार व दै. नवशक्ति)<br>दि. 15/01/2018 | दि. 17/01/2018 ते<br>दि. 25/01/2018 | सदर कालावधीत 03 निविदा प्राप्त झाल्या. |

**उपरोक्त प्रमाणे जाहिर फेर निविदा प्रसिध्द केल्यानंतर दि . 17/01/2018 ते दि. 25/01/2018 या कालावधीत जाहिर फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीमध्ये** N.I.C. **च्या संकेत स्थळावर एकूण 03 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांचे Technical Bid मधील कागदपत्राची छाननी मा . निविदा समिती समोर केली असून सदर प्राप्त तिनही निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास मा. निविदा समितीने दि. 01/02/2018 रोजी शिफारस केली आहे.**

१. **मे. श्री गणेश इंटरप्रायजेस**

२. **मे. श्रुती इंटरप्रायजेस**

३. **मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय**

**उपरोक्त शिफारशीनुसार दि. 03/02/2018 रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता / विवरणपत्र सोबत जोडलेले असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | मे. श्री गणेश इंटरप्रायजेस | मे. श्रुती इंटरप्रायजेस | मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of Tanker Contract basis for Garden and Tree Authority Department in MBMC Jurisdiction.<br>Rs. per tanker / per trip (8000 to 10000 liter) | Rs. 1050/- per tanker / per trip | Rs. 828/- per tanker / per trip | Rs. 828/- per tanker / per trip |

**उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराचे निविदाधारक (L1) यांना दर वाटाघाटीकरीता मा . निविदा समिती समोर दि. 05/02/2018 रोजी बोलाविले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत.**

| अ.क्र. | कामाचे नाव | | मे. श्रुती इंटरप्रायजेस | मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of Tanker Contract basis for Garden and Tree Authority Department in MBMC Jurisdiction.<br>Rs. per tanker / per trip (8000 to 10000 liter) | निविदेत भरलेले दर | Rs. 828/- per tanker / per trip | Rs. 828/- per tanker / per trip |
| | | वाटाघाटीअंती कमी केलेले दर | Rs. 799/- per tanker / per trip | Rs. 799/- per tanker / per trip |

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने , मैदाने, स्मशाने, व दुभाजके इत्यादी ठिकाणी पाणी देण्याकरिता भाडेतत्वावर टँकर पूरवठा करणेकामी (L-1) निविदाधारकांनी सादर केलेल्या दरामध्ये मे. श्रुती इंटरप्रायजेस व मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय यांची वाटाघाटी अंती कमीदराची निविदा स्विकारण्यास मा . निविदा समितीने दि. 05/02/2018 रोजी शिफारस केलेली आहे.**

**तरी सदर निविदाधारकांचे वाटाघाटीअंती समान दर प्राप्त झाल्याने निविदाधारक यांना विभागून काम देण्यास व सदर निविदेस मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती साहेब जे पाण्याचे टँकर येतात त्याच्यात आपले ड्रेनेज सिस्टम.............

**मा. सभापती :-**

मॅडम हे पाण्याचे नाही गार्डन आणि दूभाजकामध्ये आपण जे पाणी वापरतो त्यासाठी.

**दिप्ती भट :-**

मला समजले माझ्या बोलण्याचा वर्ड चेंज आहे. टँकरमध्ये आपण शांतीनगर अयप्पा टेंपलच्या बाजूला जे सबस्टेशन बांधले आहे. त्याच्या मधून जे पाणी आणतो तो टँकर त्याच्यामध्ये मोजतात का?

**मा. सभापती :-**

हो काऊन्ट होतात.

**दिप्ती भट :-**

ते घ्यायचे नाही कारण त्याला वास येतो आणि त्यामूळे गार्डनमध्ये मच्छर येंतात. त्यामुळे ते पाणी वापरू नये अशी सुचना आहे.

**मा. सभापती :-**

ते पाणी गार्डनच्या यूजसाठी आहे. आणि इतर यूजसाठी आहे त्याचा वापर केलाच पाहिजे.

**प्रशांत दळवी :-**

त्याच्यात आपण सुधारण करतो.

**दिप्ती भट :-**

त्याची क्वालीटी नाही. ती क्वालीटी झाल्यावर करा.

**प्रशांत दळवी :-**

त्याचे म्हणणे बरोबर आहे. दूभाजक आहेत तिकडे पाणी वापरण्यात यावे. पण जिकडे गार्डन आहेत आणि त्या गार्डनच्या शेजारी बिल्डींग आहेत त्या पाण्यातून फार दूर्गंधी येते पण आपण तेथील पाहणी केली असता आता तेथे खूप फरक पडला आहे. म्हणजे आपल्याला फिल्टरेशन करून जी औषध टाकायची होती. त्याप्रमाणात केलेली आणि ते पाणी कधी वापरतो ज्यावेळेला तलावाचे पाणी कमी झाल्यानंतर

**अनिल विराणीः-**

आपल्या दोन एस टी पी प्लानमध्ये डेली टँकर यूज करतात. आणि गार्डनला टाकतात.

**दिप्ती भट :-**

त्याच्यामध्ये किडे येतात.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापतीमहोदय ह्या चर्चेचा असा अर्थ आहे जी प्रक्रिया केली पाहिजे ती होत नाही सांडपाण्यावर प्रक्रिया होत नाही.

**सय्यद नुरजहॉ नजर हूसैन :-**

त्याच्यात किडे निघतात.

**दिप्ती भटः-**

वो हेल्थ के लिए खराब है। कल्याण और भिवंडी में मेडीकल का रिपोर्ट आया है। की लोगो की सेहत इसकी वजह सें खराब हुई है। तो आप जो भी है उसमे चेंजेस लाओ।

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय सांडपाणी खत होऊ शकते असे नाही. त्याच्यातला मर्क्यूरी लेवल वाढल्या नंतर झाडाच्या आरोग्याला नूकसानदायक साबीत होऊ शकतो. सांडपाण्यावर प्रक्रिया पूर्ण होत नाही. प्रक्रिया झालेले पाणी स्वच्छ असू शकते. त्याचा पी एच लेवल ३ ते ४ पर्यत पोहोचला पाहिजे. पाणी पूरवठयाच्या अभियंत्याने ह्याची माहिती द्यावी.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, आपण जे सिव्हरेजचे ट्रीटमेन्ट करतो ट्रीटमेन्ट केल्यानंतर हे आपण प्रायमरी आणि सेकंडरी ट्रीटमेन्ट होते. त्यामध्ये टर्सील ट्रीटमेन्ट होत नाही जेव्हा टर्सील ट्रीटमेन्ट झाली तर ते पाणी पिण्यायोग्य आणि इतर वापरासाठी करू शकतो. पण सेकंडरी ट्रीटमेन्ट केल्यानंतर त्याची बीओडी, सीओडी लेवल कमी करून ते खाडीमध्ये सोडतो. गार्डन डीपा. आमच्या संम्प बाहेर टाकतो. तेच पाणी उचलून टाकतात. ॲक्चूअली कसे असते तिथपर्यत लेवलपर्यत केलेली नसते. आपण टर्सील प्लान जो आहे तो पाच एम एल डी चा घेतलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

वाकोडे साहेब खाडीमध्ये सोडणे म्हणजे समुद्रामध्ये सोडणे पर्यावरण विभागाने तुम्हाला अशा प्रकारे पाणी सोडायची परमिशन दिली आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

त्याच्यात येणा-या पाण्याची बी ओ डी २०० ते २५० च्या बीम असते तर त्याला आपण २० पर्यत आणून सोडतो. हे २६ चे नॉर्म्स हे पॉल्यूशन कंट्रोल बोर्डाच्या त्याठिकाणी अचानक व्हिजीट होतात. ते चेक करतात. त्याच्या स्टॅन्डर्ड आपल्या ट्रीटमेन्टचे असते. यूज करण्याचे स्टॅन्डर्ड आणखी वेगळे आहे. ते टर्सिल ट्रीटमेन्ट लावायला लागते. टर्सिल ट्रीटमेन्ट आपण कूठल्याही ठिकाणी लावली नाही त्यामूळे हा प्रॉब्लेम येतो.

**सुरेश खण्डेलवाल :-**

लावण्यासाठी काय करायला लागेल.

**सुरेश वाकोडें :-**

टर्सिल ट्रीटमेन्टसाठी एक प्रायोगिक तत्वावर आपण पाच एम एलडी चा २ नंबरला ८ ला घेतला आहे. तो एक ५ एम एल डी चा करूया म्हणजे त्याचे पाणी वापरता येईल.

**दिप्ती भट :-**

आपला तसा अहवाल पाठवा की हे पाणी वापरू नका. लोकांच्या आरोग्याशी धोका करू नका.

**सुरेश वाकोडे :-**

ठीक आहे.

**तारा घरत :-**

मा. सभापतीच्या परवानगीने एक सुचना मांडू का? विहिरी आणि तलाव आहेत ती आता साफ करायला घेतल्या तर बरे पडेल भरपूर विहिरी आहेत ज्या आपण वापरतच नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो ठीक आहे. साफ करतो.

**मा. सभापती :-**

पाणपट्टे साहेब आता बाजूला पण एक विहिर आहे. टेंभा हॉस्पीटलच्या बाजूला विहिर आहे. तशाच अनेक विहिरी ह्या शहरामध्ये आहेत त्याचा पण अभ्यास करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सुचना चांगली आहे.

**मा. सभापती :-**

साहेब अस सांगू नका की सुचना चांगली आहे त्याचे इम्पलीमेन्टेशन करा आणि त्याचा अहवाल सादर करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ओके.

**तारा घरत :-**

साहेब गोडदेव गावातील एक विहिर बंद आहे.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती महोदय पालिकेच्या बाहेर जी बावडी आहे ती साफ करा.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १०६ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजक इ. ठिकाणी पाणी देण्याकरीता भाडे तत्वावर टँकर पुरवठा करणेकामी ई -टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने व जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून मागविण्यात आलेल्या फेरनिविदेबाबत. (वार्षिक निविदा)**

**ठराव क्र. ८९ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजक इ. ठिकाणी पाणी देण्याकरीता भाडे तत्वावर टँकर पुरवठा करणेकामी ई -टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने व जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून मागविण्यात आलेल्या फेरनिविदेबाबत. (वार्षिक निविदा)**

**प्रशांत दळवी :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका उदयान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता भाडेतत्वावर टॅकर पूरवठा करणेकामी ई-टेंडरिंग प्रणालीव्दारे** N.I.C. (National informatics Centre, Pune) **च्या** https://mahatenders.gov.in **संकेत स्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. (Tender I.D 2017_MBMC_ 251835_1)**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहिर निविदा सुचना<br>(दै. दोपहर का सामना व सा. सुरज प्रकाश)<br>दि. 30/10/2017 | दि. 01/11/2017 ते<br>दि. 20/11/2017 | सदर कालावधीत 04 निविदा प्राप्त झाल्या. |

**सदर कालावधीत प्राप्त 04 निविदा धारकांची Technical Bid तपासणी केली असता 02 निविदाधारक पात्र होत असल्याकारणाने ई -टेंडरिंग प्रणालीव्दारे** N.I.C. (National informatics Centre, Pune) **च्या** https://mahatenders.gov.in **संकेत स्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन जाहिर फेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. (Tender I.D 2017_MBMC_ 259916_1)**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहिर फेर निविदा सुचना<br>(मुंबई तरुण भारत व दै. पुकार)<br>दि. 30/11/2017 | दि. 05/12/2017 ते<br>दि. 14/12/2017 | एक ही निविदा प्राप्त नाही. |
| 2 | प्रथम मुदतवाढ<br>(मुंबई तरुण भारत व दै. पुकार)<br>दि. 15/12/2017 | दि. 15/12/2017 ते<br>दि. 20/12/2017 | एक निविदा प्राप्त |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | व्दितीय मुदतवाढ<br>(मुंबई तरुण भारत व दै. पुकार)<br>दि. 21/12/2017 | दि. 22/12/2017 ते<br>दि. 27/12/2017 | सदर कालावधीत 03 निविदा प्राप्त झाल्या. |

सदर कालावधीत प्राप्त 03 निविदा धारकांची Technical Bid तपासणी केली असता निविदाधारक पात्र होत नसल्याकारणाने ई -टेंडरिंग प्रणालीव्दारे N.I.C. (National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन जाहिर फेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. (Tender I.D 2018_MBMC_ 271795_1)

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहिर फेर निविदा सुचना<br>(दै. पुकार व दै. नवशक्ति)<br>दि. 15/01/2018 | दि. 17/01/2018 ते<br>दि. 25/01/2018 | सदर कालावधीत 03 निविदा प्राप्त झाल्या. |

उपरोक्त प्रमाणे जाहिर फेर निविदा प्रसिध्द केल्यानंतर दि . 17/01/2018 ते दि. 25/01/2018 या कालावधीत जाहिर फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीमध्ये N.I.C. च्या संकेत स्थळावर एकूण 03 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांचे Technical Bid मधील कागदपत्राची छाननी मा . निविदा समिती समोर केली असून सदर प्राप्त तिनही निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास मा. निविदा समितीने दि. 01/02/2018 रोजी शिफारस केली आहे.

१. मे. श्री गणेश इंटरप्रायजेस
२. मे. श्रुती इंटरप्रायजेस
३. मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय

उपरोक्त शिफारशीनुसार दि. 03/02/2018 रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता / विवरणपत्र सोबत जोडलेले असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मे. श्री गणेश इंटरप्रायजेस | मे. श्रुती इंटरप्रायजेस | मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of Tanker Contract basis for Garden and Tree Authority Department in MBMC Jurisdiction.<br>Rs. per tanker / per trip (8000 to 10000 liter) | Rs. 1050/- per tanker / per trip | Rs. 828/- per tanker / per trip | Rs. 828/- per tanker / per trip |

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराचे निविदाधारक (L1) यांना दर वाटाघाटीकरीता मा . निविदा समिती समोर दि. 05/02/2018 रोजी बोलाविले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | | मे. श्रुती इंटरप्रायजेस | मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of Tanker Contract basis for Garden and Tree Authority Department in MBMC Jurisdiction.<br>Rs. per tanker / per trip (8000 to 10000 liter) | निविदेत भरलेले दर | Rs. 828/- per tanker / per trip | Rs. 828/- per tanker / per trip |
| | | वाटाघाटीअंती कमी केलेले दर | Rs. 799/- per tanker / per trip | Rs. 799/- per tanker / per trip |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने , मैदाने, स्मशाने, व दुभाजके इत्यादी ठिकाणी पाणी देण्याकरिता भाडेतत्वावर टँकर पूरवठा करणेकामी (L-1) निविदाधारकांनी सादर केलेल्या दरामध्ये मे. श्रुती इंटरप्रायजेस व मे. सिध्दीविनायक वॉटर सप्लाय यांची वाटाघाटी अंती कमीदराची निविदा स्विकारण्यास मा . निविदा समितीने दि. 05/02/2018 रोजी शिफारस केलेली आहे.

**तरी सदर निविदाधारकांचे वाटाघाटीअंती समान दर प्राप्त झाल्याने निविदाधारक यांना विभागून काम देण्यास व सदर निविदेस मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०७, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक औषधे , सर्जिकल मटेरिअल, लॅब मटेरिअल, खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत.**

**मिरादेवी यादव :-**

सदरचा विषय प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय ठरावाच्या बाजूने बोलणार आहे मला अधिकाऱ्यांना प्रश्न आहे. हा स्टॉक आणि एक्सपायरी

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो आपल्या मुख्य कार्यालयामध्ये टेंभा हॉस्पीटल राहूल भोईर बसतात त्याठिकाणी दोन्ही हॉस्पीटलचा रेकॉर्ड मेन्टेन केलेला असतो. प्रत्येक एक्सपायरीचे रजिस्टर मेन्टेन केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही ४० पानांचा गोषवारा दिलेला आहे. तुमच्याकडे इन्डेनिंग सिस्टम असेल ना की स्टॉक संपला म्हणजे आपल्याकडे १०० क्रोसीन होत्या ९० संपल्या १० राहिल्या तर क्रोसीन मागावायला पाहिजे. अशा प्रकोरे वेळोवेळी हा विषय आमच्याकडे आला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आमच्याकडे माहिती आहे वेळोवेळी देतो.

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समिती मध्ये मंजूरीला आणले पाहिजे एवढी औषध संपली आहेत. ही विकत घ्यायची आहेत. त्याला वार्षिक दर मंजूर करून घेतले पाहिजेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दरवर्षी वार्षिक दरच मंजूर करून घेतो.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यात कॉन्टेटी टाकली नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आमच्याकडे शिल्लक किती आहेत. रिक्वायरमेन्ट किती आहे. वेळोवेळी जसे लागते तसे आपण देतो.

**जुबेर इनामदार:-**

मी सातत्याने आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्याशी चर्चा करत होतो. ह्या सिस्टमसाठी आम्ही कोणती प्रणाली वापरत नाही. पालिकेच्या फार्मसीमधून औषध गेल्यानंतर तो तेवढा मटेरियल डिडक्ट झाला पाहिजे. ऑटो रिडयूसिंग सिस्टम जी असते आपल्या स्टॉकची जसे एक साधारण फार्मसीटीकलच्या शॉपमध्ये ही प्रणाली वापरली जाते. पूर्ण पालिकेचे हॉस्पीटल टेंभा तसेच इंदिरा गांधी रुग्नालय हे दोन्ही चालत असतानासुध्दा आज आपल्याकडे ती प्रणाली उपलब्ध नाही. जेणेकरून आपल्याला समजेल की हा स्टॉक आहे की नाही बऱ्याच वेळी रोगी तिथे गेल्यानंतर त्यांना सांगितले जाते की आमच्याकडे औषध उपलब्ध नाहीत. ही परिस्थिती आहे. त्याला अशीच बरीच कारणे असू शकतात. आज सेंट्रलाईज सर्व सिस्टम पाहिजे. टेंभा आणि इंदिरा गांधी रुग्नालय उद्या समजा टेंभा हॉस्पीटल शासनाने हस्तांतरण करून घेतले तर ठीक आहे पण कमीत कमी आपल्याकडे इंदिरा गांधील रुग्नालय किंवा आपले प्रायमरी हेल्थ केयर सेन्टर जे आम्ही चालवतो त्यांना सेंट्रलाईज सिस्टम केले पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो मध्येच आम्ही प्रयत्न केले त्या सॉफ्टवेयरची कॉस्ट ७० ते ८० लाख रू. म्हणतात. कॉस्ट फार जास्त आहे.

**जुबेर इनामदार :-**

ओपन मार्केटमध्ये त्याची मागणी करा. जो कमीत कमी येईल तो तुमच्याकडे येईल ना.

**मा. सभापती :-**

पाणपट्टेसाहेब सुचना चांगली आहे. तुम्ही जर आता ट्रीप मारली तर आपला जो टेंभा हॉस्पीटलमध्ये जो फार्मसी अहे तो बसून काय करतो त्याच्याकडे किती स्टॉक आहे किती एक्सपायरी डेट झाल्या आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपल्याकडे रेकॉर्ड आहे ना प्रत्येक टॅबलेटचा आपल्याकडे रेकॉर्ड आहे. कूठल्या कंपनीचा किती स्टॉक आहे.

**मा. सभापती :-**

त्यांनी जे सांगितले ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सॉफ्टवेयरची चौकशी सुध्दा केली होती. गिते साहेबांनी २-३ प्रेझेन्टेशन मागवले होते.

**राज घरत :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, फार्मसी मॅनेजमेंटसाठी आपण निवीदा मागवलेली आहे. त्यासाठी चार निविदा आल्या आहेत. त्याचे टेक्नीकल इव्हॅल्यूशन झालेले आहे. त्यानंतर जे क्वालीफाय झाल्यानंतर फायनाशीयल इव्हॅल्यूशन होऊन त्या ठेकेदारास कार्यादेश दिले.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे निविदा निघाल्या आणि पाणपट्टे साहेबांना माहित नाही.

**राज घरत :-**

गिते साहेब असताना जो साहेबाकडे डेमो आयोजित केला तेव्हा त्यांनी अंदाजीत दोन करोडचे बजेट दिले नंतर त्याला कमी करून गिते साहेबांनी त्याला २५ लाखावर आणले.

**जुबेर इनामदार :-**

निविदा प्रक्रिया झाली हे ७० लाख बोलतात तुम्ही २५ लाख बोलतात.

**राज घरत :-**

गिते साहंबांनी २५ लाखाला मंजूरी दिली. आणि २५ लाखची निविदा मागवतो. २ करोडचे पूर्ण हॉस्पीटलचे मॉड्यूल होते. आपल्याला तेवढी आवश्यकता नाही म्हणजे आपल्याला तेवढी आवश्यकता नाही आपल्याला जेवढी आवश्यकता आहे औषध आणि हे ते २५ लाखात................

**जुबेर इनामदार :-**

तुमची शेवटच्या टप्प्यावर निविदा प्रक्रिया थांबली आहे. आणि डी एम सी ला त्याविषयी माहिती नाही.

**राज घरत :-**

अगोदर डॉ. पडवळ साहेब होते त्यांना माहिती आहे.

**मा. सभापती :-**

ह्यापूढे लक्षात ठेवा माहिती उपायुक्त आणि मा. आयुक्तांना पण माहिती द्या. ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १०७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक औषधे, सर्जिकल मटेरिअल, लॅब मटेरिअल, खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत.**

**ठराव क्र. ९० :-**

सदरचा विषय प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. मिरादेवी यादव** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०८ **हाऊस किपींग करीता मागविण्यात आलेल्या निविदेचे दर मंजूर करणेबाबत.**

**रवि व्यास :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयाकरीता हाऊसकिपींगसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु तीन निविदाधारकांनी निविदा सादर केल्या असता फक्त एकमेव निविदाधारकाने तांत्रिक लिफाफ्यामध्ये कागदपत्रे सादर केली होती. त्यामुळे स्पर्धा मोठया प्रमाणात झाली नसल्याचे निदर्शनास येत असल्याने मोठया प्रमाणात जाहीर प्रसिध्दी देवुन फेर निविदा मागविण्यात यावी, जेणेकरून स्पर्धा होवून महानगरपालिकेस मोठया प्रमाणात आर्थिक फायदा होवू शकतो. करीता फेर निविदा मागविण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १०८ :-**

**हाऊस किपींग करीता मागविण्यात आलेल्या निविदेचे दर मंजूर करणेबाबत.**

**ठराव क्र. ९१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयाकरीता हाऊसकिपींगसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु तीन निविदाधारकांनी निविदा सादर केल्या असता फक्त एकमेव निविदाधारकाने तांत्रिक लिफाफ्यामध्ये कागदपत्रे सादर केली होती. त्यामुळे स्पर्धा मोठया प्रमाणात झाली नसल्याचे निदर्शनास येत असल्याने मोठया प्रमाणात जाहीर प्रसिध्दी देवुन फेर निविदा मागविण्यात यावी, जेणेकरून स्पर्धा होवून महानगरपालिकेस मोठया प्रमाणात आर्थिक फायदा होवू शकतो. करीता फेर निविदा मागविण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०९, **लाँड्री करीता मागविण्यात आलेल्या निविदेचे दर मंजूर करणेबाबत.**

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय, मिरारोड व भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय, भाईंदर (प) येथिल कर्मचाऱ्यांचे पोषाख, बेडशिट व इतर सर्व लिनेन धुण्याकरिता लॉड्री करिता मे. एस. आर. इंटरप्राईजेस यांनी वाटाघाटीअंती त्यांनी खालिल प्रमाणे दर सादर केलेले आहेत

| Sr. No | Category of Linen | Items Included | Rate per article | rate after negotiation |
|---|---|---|---|---|
| 1 | **Extra Small** | Gloves Bag, Mask, Cap, Mops | 12.00 | - |
| 2 | **Small** | Baby Wrapper, Towel, Patient Towel, Pillow Cover, Screen Towel | 14.45 | 14.00 |
| 3 | **Medium** | Abdominal Sheet, Female Patient Gown, Green Screen 3 fold, Honeycomb Towel, Legins, Operation Draw-sheet, Surgeon Gown, Surgeon Shirt-pant, , Table cloth, Hospital worker, OT Gown, Patient Pyjama Coat, Uniform Apron, Perennial Sheets for OT | 28.80 | 27.50 |
| | | Window curtain Green, solapuri chaddar | 45.00 | 43.00 |
| 4 | **Big** | Bed sheets, Chaddar | 34.99 | 34.00 |
| 5 | **Dry cleaning** | Blanket | 69.99 | 68.00 |

तरी मे. एस. आर. इंटरप्राईजेस यांनी वाटाघाटीअंती सादर केलेले दर स्विकारणेस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**हसमूख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १०९ :-**

**लाँड्री करीता मागविण्यात आलेल्या निविदेचे दर मंजूर करणेबाबत.**

**ठराव क्र. ९२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय, मिरारोड व भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय, भाईंदर (प) येथिल कर्मचाऱ्यांचे पोषाख, बेडशिट व इतर सर्व लिनेन धुण्याकरिता लॉड्री करिता मे. एस. आर. इंटरप्राईजेस यांनी वाटाघाटीअंती त्यांनी खालिल प्रमाणे दर सादर केलेले आहेत

| Sr. No | Category of Linen | Items Included | Rate per article | rate after negotiation |
|---|---|---|---|---|
| 1 | **Extra Small** | Gloves Bag, Mask, Cap, Mops | 12.00 | - |
| 2 | **Small** | Baby Wrapper, Towel, Patient Towel, Pillow Cover, Screen Towel | 14.45 | 14.00 |
| 3 | **Medium** | Abdominal Sheet, Female Patient Gown, Green Screen 3 fold, Honeycomb Towel, Legins, Operation Draw-sheet, Surgeon Gown, Surgeon Shirt-pant, , Table cloth, Hospital worker, OT Gown, Patient Pyjama Coat, Uniform Apron, Perennial Sheets for OT | 28.80 | 27.50 |
| | | Window curtain Green, solapuri chaddar | 45.00 | 43.00 |
| 4 | **Big** | Bed sheets, Chaddar | 34.99 | 34.00 |
| 5 | **Dry cleaning** | Blanket | 69.99 | 68.00 |

तरी मे. एस. आर. इंटरप्राईजेस यांनी वाटाघाटीअंती सादर केलेले दर स्विकारणेस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११०, **निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम)**

**मेघना रावल :-**

Formulating an urban renewal policy for mira bhayander पॉलिसी प्रमाणे जर महानगरपालिका क्षेत्रातील जनतेला याचा काय फायदा होणार आहे व इतर महानगरपालिकानी या संबंधित पॉलिसी करीता काय धोरण ठरविले आहे, याचा खुलासा नाही. शासनातर्फे या पॉलिसीमध्ये जाहीर झालेल्या योजनांबाबत प्रशासनाने गोषवाऱ्यात काही नमूद केले नसुन सद्या तरी या पॉलिसीची गरज वाटत नसल्याने निविदा रद्द करण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११० :-**

**निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम)**

**ठराव क्र. ९३ :-**

Formulating an urban renewal policy for mira bhayander पॉलिसी प्रमाणे जर महानगरपालिका क्षेत्रातील जनतेला याचा काय फायदा होणार आहे व इतर महानगरपालिकानी या संबंधित पॉलिसी करीता काय धोरण ठरविले आहे, याचा खुलासा नाही. शासनातर्फे या पॉलिसीमध्ये जाहीर झालेल्या योजनांबाबत प्रशासनाने गोषवाऱ्यात काही नमूद केले नसुन सद्या तरी या पॉलिसीची गरज वाटत नसल्याने निविदा रद्द करण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. मेघना रावल अनुमोदन :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११, **माहे ऑक्टोबर-२०१७ ते माहे डिसेंबर-२०१७ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत. (दि. १४/०२/२०१८ रोजीचे प्रलंबित प्रकरण क्र. ८९)**

**मा. सभापती :-**

हे प्रकरण नंतर घ्या.

**प्र.नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ११२, **मा. स्थायी समिती सभेत प्रस्तावाचे अवलोकन करणे. ( संगणक विभाग ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील संगणक, सर्वर व साहित्य देखभाल दुरुस्ती करणे** .११३, **मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत. (पशुसंवर्धन विभाग)** ११४, **पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (आस्थापना विभाग)**

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ११२ :-**

**मा. स्थायी समिती सभेत प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील संगणक, सर्वर व साहित्य देखभाल दुरुस्ती करणे.**

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) for Computers,LAN and servers and facitity Management services in कामाची दि.३१/१०/२०१७ रोजी Online E-Tendering व्दारे (२०१७_MBMC_२५२१५२_१) निविदा सुचना मागविणेत आलेल्या होत्या. निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याने या निविदेस दि.१३/११/२०१७ रोजी प्रथम मुदतवाढ देण्यात आली. या निविदेस प्रतिसाद मिळून ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी एकूण ३ निविदाधारक पात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहे.

| Sr.No. | Item | Qty | M/s.Mapleton Technologies Pvt. Ltd., | | M/s.Mapleton Technologies Pvt. Ltd., (वाटाघाटीनंतरचे दर) | M/s.Kommineni Infotech Pvt.Ltd., | | M/s. S-way Computers | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Unit Rate per year | Total Rate per year | Revised Total Rate per year (वाटाघाटीनंतरचे दर) | Unit Rate per year | Total Rate per year | Unit Rate | Total Rate per year |
| 1. | Desktops | 174 | 1000 | 174000 | 170520 | 300 | 52200 | 899 | 156426 |
| 2. | Antivirus Annual Renewal | 100 | 400 | 40000 | 39500 | 450 | 45000 | 399 | 39900 |
| 3. | IBM Servers | 2 | 8000 | 16000 | | -- | -- | 19999 | 39998 |
| 4. | Wipro Server | 1 | 8000 | 8000 | | -- | -- | 9999 | 9999 |
| SUB TOTAL (I) | | | | 238000 | 234020 | | 97200 | | 246323 |
| 1. | Cisco Catalyst 2950 switch | 2 | 2000 | 4000 | | 4200 | 8400 | 3999 | 7998 |
| 2. | 24 Port switch | 15 | 1500 | 22500 | | -- | -- | 999 | 14985 |
| | 24 Port CISCO CATALYST 2900 TCS n/w SWITCH | 5 | -- | -- | | 2400 | 12000 | -- | - - |
| | 24 Port D-Link Network Switch | 1 | -- | -- | | 1100 | 1100 | -- | -- |
| 3. | 16 Port switch | 4 | 200 | 800 | | 600 | 2400 | 499 | 1996 |
| 4. | 8 Port Switch | 15 | 200 | 3000 | | 200 | 3000 | 199 | 2985 |
| 5. | LAN WORK OF mbmc Head Office, ward office, 1,2,3,4,5,6 Divisional office kankiya, kasha, Ghodbundar, chena, Murdha, Uttan, Dongari, Indira Gandhi Hospital | 1 | 20000 | 20000 | 19800 | -- | -- | 19999 | 19999 |
| 6. | Installation of New LAN point with material | 25 | 800 | 20000 | | -- | -- | 749 | 18725 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (including IO, Raj45, Cat6. cable, casing patti, Electrical Charges and Etc for commencing LAN 1point length up to 25 meter) | | | | | | | | |
| 7. | Patch Cord (per meter) | 1 | 100 | 100 | | -- | -- | 49 | 49 |
| Sub Total (II) | | | | 70400 | | | 26900 | | 66737 |

**Payment for these items will be made only if New LAN points and Patch Cords are required**

| Sr.No. | Item | No. of Resources | No.of Months | M/s.Mapleton Technologies Pvt. Ltd., | | M/s.Mapleton Technologies Pvt. Ltd., (वाटाघाटीनंतरचे दर) | M/s.Kommineni Infotech Pvt.Ltd., | | M/s. S-way Computers | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Monthly rate per resource | Total Amount | Revised Total Rate per year (वाटाघाटीनंतरचे दर) | Monthly rate per resource | Total Amount | Monthly rate per resource | Total Amount |
| 1. | Hardware Engineer | 2 | 12 | 10000 | 240000 | 240000 | 15000 | 360000 | 14999 | 359976 |
| 2. | Network Engineer | 1 | 12 | 12000 | 144000 | 144000 | 18000 | 216000 | 15999 | 191988 |
| | SUB TOTAL (I + II + III) | | | | 384000 | 384000 | | 576000 | | 551964 |
| | GRAND TOTAL T (I + II + III) | | | 692400 (Exclusive of GST and will be charged extra as applicable) | | 688220 | 700100 GST @18%=126018/- Total AMC Value with GST = Rs 826118/- | | 865024 (Exclusive of GST and will be charged extra as applicable) | |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता M/s.Mapleton Technologies Pvt.Ltd., यांनी सर्व घटकांचे मिळून निविदेत सादर केलेले दर हे इतर २ निविदाकार M/s. Kommineni Infotech Pvt.Ltd., व M/s.S-Way Computer यांच्या दराच्या तुलनेत कमी असल्याने M/s.Mapleton Technologies Pvt.Ltd., यांचे निविदेतील दरास मा. निविदा निवड समितीच्या शिफारसीनुसार M/s.Mapleton Technologies Pvt.Ltd., यांच्या समवेत कामाचा करारनामा करून कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.05/02/2018 रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरकामी अंदाजे रु.६,८८,२२०/- (अधिक GST) खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे कलम **73**(ड) नुसार मा.स्थायी समिती सभेत अवलोकन करण्यात येत आहे.

सही /-
**मा. सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ११३ :-**

**मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत. (पशुसंवर्धन विभाग)**

**ठराव क्र. ९६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण आणि जखमी कुत्रे, पिसाळलेल्या कुत्र्यांचा औषधोपचार,बंदोबस्त करणेकामी जा.क्र. मनपा/पशुसंवर्धन/११४।२०१७-१८ दि. ०४/१२/२०१७ अन्वये "सर्वश्रेष्ठ राजसत्ता" व " दै.समाधि प्रकाश" या वर्तमानपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदेची मुदत १९/१२/२०१७ रोजी दु. १.०० वाजेपर्यंत होती. सदर कालावधीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने दि. १९/१२/२०१७ ते दि. २२/१२/२०१७ रोजी प्रथम मुदतवाढ, दि. २२/१२/२०१७ ते दि. २८/१२/२०१७ रोजी द्वितीय मुदतवाढ, आणि दि. २८/१२/२०१७ ते दि. ०१/०१/२०१८ रोजी तृतीय मुदतवाढ देण्यात

आल्या. परंतु एकही निविदा प्राप्त न झाल्याने फेर निविदा दि. ०५/०१/२०१८ रोजीच्या "ठाणे वैभव व मुंबई दुत" या वर्तमानपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार १ निविदा मुदतीत प्राप्त झाली.

सदर निविदेचे दरपत्रक दि. २९/०१/२०१८ रोजी उघडले असता दराचा तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | कामाचा तपशील | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. माय वेट्स चॅरीटेबल ट्रस्ट अँड रिसर्च सेंटर ए / ३०४,सारंग CHS, सदनिका क्र. ४५/५६, रोड क्र. ५, सेक्टर ८, न्यू पनवेल -४१०२०६ | १)मोकाट कुत्रे पकडणे (डॉग व्हॅन व कर्मचारी स्वतःचे असावेत.)<br>२) पकडून सदरचे कुत्रे शस्त्रक्रिया ठिकाणी नेणे.<br>३) प्रजनन शस्त्रक्रिया करणे व श्वान दंश लस नेणे.<br>४) शस्त्रक्रिया केलेल्या कुत्र्यांना औषधोपचार व खानपान व्यवस्था करणे.<br>५) प्रजनन शस्त्रक्रिया झाल्यावर ज्या जागेवरुन मोकाट कुत्री पकडली असतील त्याच जागेवर नेऊन सोडणे. | रु. १५५०/- (प्रती श्वान) | रु. १३५०/- (प्रती श्वान) |

वरीलप्रमाणे वाटाघाटी दरम्यान सदर निविदाधारकाने रु. १५५०/- ऐवजी रु.१३५०/- दराप्रमाणे काम करण्यास संमती दर्शविली आहे. सदर प्राप्त निविदा स्विकारणेस मा. आयुक्त सो. यांनी दि. ३०/०१/२०१८ रोजी मंजुरी दिलेली असून सदर संस्थेस दि.०२/०२/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

उपरोक्त प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा. स्थायी समिती सभेत अवलाकन करण्यात येत आहे.

**सही /-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रवि व्यास :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार तरतुदी करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार केलेल्या तरतुदीप्रमाणे वैद्यकीय विभाग (स्थायी) तसेच स्मशान भुमी, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, सार्व. बांधकाम विभाग, संगणक विभाग या विभागासाठी करण्यात आलेली तरतुद अपूरी पडत असल्यामुळे पूनर्विनियोजन करुन तरतूद वाढविणे आवश्यक आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाकरीता एकुण तरतुद तसेच झालेला खर्च पाहता, उपलब्ध होणारी तरतुद रु. ४७०.०० लाख उपलब्ध होत आहे.

परंतु वैद्यकीय विभाग (स्थायी) तसेच स्मशान भुमी, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, सार्व. बांधकाम विभाग, संगणक विभाग या विभागांसाठी प्रस्तावित वाढीची रक्कम रु. ४७०.०० लाख आहे.

उपलब्ध होणारी तरतुद रु. ४७०.०० लाख असून प्रस्तावित वाढीचा खर्च रु. ४७०.०० लाख होणार आहे. तरी पुनर्विनियोजनास ही सभा मंजूरी देत आहे. (सोबत पुनर्विनियोजन तक्ता जोडला आहे.)

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११४ :-**

**पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (आस्थापना विभाग)**

**ठराव क्र. ९७ :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार तरतुदी करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार केलेल्या तरतुदीप्रमाणे वैद्यकीय विभाग (स्थायी) तसेच स्मशान भुमी, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, सार्व. बांधकाम विभाग, संगणक विभाग या विभागासाठी करण्यात आलेली तरतुद अपूरी पडत असल्यामुळे पूनर्विनियोजन करुन तरतूद वाढविणे आवश्यक आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाकरीता एकुण तरतुद तसेच झालेला खर्च पाहता, उपलब्ध होणारी तरतुद रु. ४७०.०० लाख उपलब्ध होत आहे.

परंतु वैद्यकीय विभाग (स्थायी) तसेच स्मशान भुमी, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, सार्व. बांधकाम विभाग, संगणक विभाग या विभागांसाठी प्रस्तावित वाढीची रक्कम रु. ४७०.०० लाख आहे.

उपलब्ध होणारी तरतुद रु. ४७०.०० लाख असून प्रस्तावित वाढीचा खर्च रु. ४७०.०० लाख होणार आहे. तरी पुनर्विनियोजनास ही सभा मंजूरी देत आहे. (सोबत पुनर्विनियोजन तक्ता जोडला आहे.)

## आस्थापना विभाग
## नमुना क्र. १० नियम (३०(३)) पूर्नविनियोजन तक्ता

| अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | झालेला खर्च | शिल्लक खर्च | उपलब्ध होणारी तरतुद (*) | | अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | झालेला खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थायी | | | | | | | स्थायी | | | | | लेखाशिर्ष, स्थायी सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागामधील एकुण शिल्लक तरतुद १६२९.०६ लाख असून, सदर मुळ तरतुदीतून स्थायी सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागामधील लेखाशिर्षासाठी या वर्ष अखेर पर्यंत होणारा खर्च वजा जाता उपलब्ध होणारा खर्च (*) रु. ४७०.०० लाख यामधून रु. ४७०.०० लाख इतकी तरतुद पुर्नविनियोजनासाठी वर्ग करणेस शिफारस आहे. |
| १. | सामान्य प्रशासन विभाग | ५०१.५५ | २९४.११ | २०७.४४ | ७०.०० | | १. | वैद्यकीय विभाग | ८०० | ५०४.७१ | ७०.०० | |
| २. | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३०७०.३४ | १९१०.०९ | ११६५.२५ | ३५०.०० | | अस्थायी | | | | | |
| ३. | सार्वजनिक बांधकाम विभाग | ५३५.२८ | २७८.९१ | २५६.३७ | ५०.०० | | १. | स्मशानभुमी | ९२.८० | ७६.४३ | २५.०० | |
| | | | | | | | २. | उद्यान विभाग | ४००.०० | ३६७.६२ | १८०.०० | |
| | | | | | | | ३. | अतिक्रमण विभाग | १२३.७५ | ११६.३८ | ४५.०० | |
| | | | | | | | ४ | बांधकाम विभाग | १९४.४० | १९१.४ | १२.०० | |
| | | | | | | | ५. | संगणक विभाग | ३०६.०४ | २९९.८९ | १३८.०० | |
| | | | | | | | | | | | | |
| **एकुण** | | | | **१६२९.०६** | **४७०.००** | | **एकुण** | | | | **४७०.००** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **मुख्य लिपीक** | **आस्थापना अधीक्षक** | **सहा.आयुक्त (सा.प्र.)** | **मुख्यलेखाधिकारी** | **मुख्यलेखापरीक्षक** | **मा.उप-आयुक्त (मु.)** |
| **मिरा भाईदर महानगरपालिका** | **मिरा भाईदर महानगरपालिका** | **मिरा भाईदर महानगरपालिका** | **मिरा भाईदर महानगरपालिका** | **मिरा भाईदर महानगरपालिका** | **मिरा भाईदर महानगरपालिका** |

**सुचक :- श्री. रवि व्यास** **अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

२ ‘‘क’’ चे विषय घेऊ मग जमाखर्चाचे अवलोकन घेऊ या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११५, महिला व बालकल्याण समितीमार्फत ०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त १०० महिलांना रिक्षा उपलब्ध करणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

महिला रिक्षा(प्रवासी) ड्रायव्हर/मालक/मदतनीस उपक्रम राज्यातील महिला संरक्षण व सक्षमीकरण बाबतचा आहे. विशेषत महिलांची अडवणुक/संकुचितपणा/गैरफायदा घेण्याच्या घटना मोठया प्रमाणात वाढु लागल्या आहे. यासाठी महिलांना या व्यवसायाद्धारे समाजात आणुन त्याचा वावर वाढवून संकटांची मर्यादा कमी करुन धाडसीपणा आणणे तसेच महिलांना संरक्षण व सक्षमीकरण गरजेचे आहे.

तसेच स्त्रीचे अस्तित्व चुल व मुल न राहता तिला हक्क बजावणीसाठी सर्व समावेशक बनविणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संसाराचा गाडा चालविण्यासाठी आर्थिक दृष्टया स्वयंसिध्द व सक्षम केले पाहिजे त्यासाठी संरक्षण व आर्थिक दृष्टया प्राप्तीसाठी सक्षमीकरण आधारावर प्रत्येक तालुक्यात महिलांना रिक्षा(प्रवासी) वाहतुक करण्याचे प्रशिक्षण देवुन रिक्षा चालविण्याद्धारे स्थानिक स्तरावर महिलांचे परिवहन सुरक्षित होण्यासाठी या उपक्रमाचे नियोजन महाराष्ट्र शासन करत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १०० रिक्षा सी.एन.जी/पेट्रोलवर चालणाऱ्या रिक्षा घेण्यासाठी मा.महासभेच्या ठरावानुसार प्रति लाभार्थ्या १,७५,०००/- अनुदान व प्रति लाभार्थ्या यांच्याकडून रु.२५०००/- रक्कम रुपये घेवुन खरेदी कार्यवाही करावी.

जागतिक महिला दिनानिमित्त व्हिडीओ कॅमेरासाठी मनपा/सचिव/१०१/२०१६-१७दि.१४/११/२०१७ च्या कार्यादेशानुसार प्रज्ञा फोटो स्टुडीओ यांना कार्यादेश देण्यात यावे व रिक्षा वाटपाचा कार्यक्रम दि.०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त करावयाचा असल्यामुळे वेळ कमी आहे. तसेच मा.महासभेने सदरची रिक्षा बजाज फोरस्ट्रोक रिक्षा सी.एन.जी/पेट्रोल वर चालणारी रिक्षा घेण्यासाठी ठराव केलेला आहे. त्यानुसार अधिकृत डिलर रिक्षा बजाज फोरस्ट्रोक डिलर सुरेस व्हिलस यांचेकडे दरपत्रक मागविण्यात आले आहे व भविष्यात निविदा मागविण्यापेक्षा बजाज कंपनी यांच्या अधिकृत डिलरकडून रिक्षा दरपत्रकाप्रमाणे मागविल्यास स्वस्त पडतील व मनपाचा आर्थिक फायदा होईल त्यानुसार त्यांच्या दराप्रमाणे सुरेश व्हिलस, लुईस वाडी, ठाणे(प.) हया अधिकृत डिलरकडून १० रिक्षा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५(२)(२) नुसार खरेदी करण्यास हि सभा मंजुरी देत आहे. व प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी त्वरीत करुन महिला दिन ०८ मार्च च्या पुर्वी रिक्षा आणणे बाबतची त्वरीत कार्यवाही करावी त्यामुळे ०८ मार्च महिला दिना निमित्त रिक्षांचे गरजु महिलांना वाटप करता येईल असा मी ठराव मांडत आहे.

**मेघना रावल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय विषय चांगला आहे. महासभेत ह्या विषयावर चर्चा झाली निर्णय सी एन जी चा पेट्रोलचा काय घेतला. इथे ऑब्लीक आहे तरतूद.................

**मा. सभापती :-**

आपण तरतूद केली आहे. पुर्नविनियोजनामध्ये आपण महासभेत तरतूद केली आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने तशाप्रकारे पुर्नविनियोजन मंजूर केले आहे का?

**मा. सभापती :-**

यस.

**जुबेर इनामदार :-**

कारण प्रशासनाच्या माध्यमातून गोषवा-यामध्ये कूठेही तशा प्रकारचा उल्लेख नव्हता. तसे पुर्नविनियोजन आलेले नाही. पुर्नविनियोजनाचा अधिकार किंवा विषय देण्याचा अधिकार १०० टक्के प्रशासनाला आहे. सर्व बाबीची चाचपणी करून आर्थिक परिस्थिती ऑडिटरचा रिपोर्ट अकाऊटन्टचा रिपोर्ट हे सगळे एकत्र घेऊन तो पुर्नविनियोजनाचा विषय प्रशासन प्रस्तावित करत असते. प्रशासनाने प्रस्तावित केलेला नाही. खरोखरच करायचा असेल तर त्याची आर्थिक तरतूद काय?

**मा. सभापती :-**

आपण आर्थिक तरतूद पुर्नविनियोजन माहसभेत करूनच हा प्रस्ताव प्रशासनाने २ ‘‘क’’ खाली आणलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे पण त्याची तरतूद इथेही दाखवलेली नाही. गोषवा-यामध्ये तरतूद केलेली नाही.

**मा. सभापती :-**

प्रत्येक वेळी तरतूद दाखविण्याची गरज नाही.

**जुबेर इनामदार :-**

आपली स्थायी समिती आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. तशी तरतूद आपण केलेली आहे. तरतुदीप्रमाणेच आपण दरपत्रकाप्रमाणे रिक्षा मागवतो.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने उत्तर द्यावे.

**दिप्ती भट :-**

कधी केली त्यांनी

**जुबेर इनामदार :-**

प्रशासन तरतूद करेल ना. तुम्ही त्यांना मंजूरी देऊ शकता. सदस्यांना अधिकार मंजूरी देण्याचा आहे. सभागृहात सांगा तरतूद केली तर केली.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. नवीन लेखाशिर्ष तसे तयार केलेले आहे. त्यामध्ये ५० लाखाची तरतूद दाखवलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

अर्थसंकल्प संपायला आला आणि नविन लेखाशिर्ष तुम्ही तयार केल. तुम्ही पुर्नविनियोजनाचा कूठलाही प्रस्ताव महासभेत सादर केला का या विषयासाठी?

**शरद बेलवटे :-**

पुर्नविनियोजनसाठी नाही. नविन लेखाशिर्ष तयार केले.

**जुबेर इनामदार :-**

८ मार्चला रिक्शा उपलब्ध करून द्यायची आहेत. म्हणजे तुम्हाला इथे २० लाख रू. पाहिजे २० लाखाची तरतूद कूठून केली त्याचे उत्तर द्या.

**शरद बेलवटे :-**

सुधारित बजेटमध्ये पण केली आहे.

**जुबेर इनामदार :-**

कोणत्या वर्षामध्ये.

**शरद बेलवटे :-**

सुधारित बजेटमध्ये.

**जुबेर इनामदार :-**

२०१७-१८ च्या

**शरद बेलवटे :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना मंजूरी कूठे दिली आहे. साहेब उत्तर द्यायचे असेल तर ठामपणे द्या आम्ही तरतूद केली पुर्नविनियोजनाचा जो ठराव होता गोषवा-यात महासभेने जो ठराव केला आम्ही मंजूर करतो असे सांगा. प्रशासनाची तशी भुमिका असेल तर आम्हाला पुढे शासनाला काय प्रश्न विचारायचे ते विचारू तुम्ही गोल गोल उत्तर का देता.

**मा. सभापती :-**

त्यांनी गोल गोल उत्तर दिले नाही. त्यांनी स्पष्ट आणि ठणकावून सांगितले आहे. की महासभेमध्ये पुर्नविनियोजन केलेले आहे. आणि सुधारित अंदाजपत्रकामध्ये त्यांनी नमूद केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

आमचा ह्या विषयावर तरतूद नाही प्रशासनाने तरतूदीसहीत विषय परत सादर करावा अशी माझी सुचना आहे.

**प्रशांत दळवी :-**

म्हणजे तुमचा विरोध आहे.

**जुबेर इनामदार:-**

विरोध नाही. तुम्ही १० रिक्शा नाही तर १०० द्या पण त्याची तरतूद करायला लागेल.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय आपल्या परवानगीने बोलतो, जुबेरजी आपण आपल्या स्वतःच्या खिशातून देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

पालिकेचा पैसा आहे. गोर गरिब जनतेचा पैसा आहे.

**प्रशांत दळवी :-**

हे बघा गरिब गरजू महिलानाच देतो. ठरावामध्ये तशी तरतूद आहे आपण वाचले. गरिब महिलानांच देतो. सर्व मिरा भाईदर जनतेचाच पैसा आहे. त्यांनी ठणकावून सांगितले. तरतूद केलेली आहे.

**दिप्ती भट :-**

रिक्शा तुम्ही आणा.पण तरतूद नाही तर पत्रकार पण विचारतील.

**जुबेर इनामदार :-**

तरतूदी अभावी साहेब ह्या विषयावर आमचा विरोध आहे.

**प्रकरण क्र. ११५ :-**

महिला व बालकल्याण समितीमार्फत ०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त १०० महिलांना रिक्षा उपलब्ध करणेबाबत.

**ठराव क्र. ९८ :-**

महिला रिक्षा(प्रवासी) ड्रायव्हर/मालक/मदतनीस उपक्रम राज्यातील महिला संरक्षण व सक्षमीकरण बाबतचा आहे. विशेषत महिलांची अडवणुक/संकुचितपणा/गैरफायदा घेण्याच्या घटना मोठया प्रमाणात वाढु लागल्या आहे. यासाठी महिलांना या व्यवसायाद्वारे समाजात आणुन त्याचा वावर वाढवून संकटांची मर्यादा कमी करुन धाडसीपणा आणणे तसेच महिलांना संरक्षण व सक्षमीकरण गरजेचे आहे.

तसेच स्त्रीचे अस्तित्व चुल व मुल न राहता तिला हक्क बजावणीसाठी सर्व समावेशक बनविणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संसाराचा गाडा चालविण्यासाठी आर्थिक दृष्टया स्वयंसिध्द व सक्षम केले पाहिजे त्यासाठी संरक्षण व आर्थिक दृष्टया प्राप्तीसाठी सक्षमीकरण आधारावर प्रत्येक तालुक्यात महिलांना रिक्षा(प्रवासी) वाहतुक करण्याचे प्रशिक्षण देवुन रिक्षा चालविण्याद्वारे स्थानिक स्तरावर महिलांचे परिवहन सुरक्षित होण्यासाठी या उपक्रमाचे नियोजन महाराष्ट्र शासन करत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १०० रिक्षा सी.एन.जी/पेट्रोलवर चालणाऱ्या रिक्षा घेण्यासाठी मा.महासभेच्या ठरावानुसार प्रति लाभार्थ्या १,७५,०००/- अनुदान व प्रति लाभार्थ्या यांच्याकडून रु.२५०००/- रक्कम रुपये घेवुन खरेदी कार्यवाही करावी.

जागतिक महिला दिनानिमित्त व्हिडीओ कॅमेरासाठी मनपा/सचिव/१०१/२०१६-१७दि.१४/११/२०१७ च्या कार्यादेशानुसार प्रज्ञा फोटो स्टुडीओ यांना कार्यादेश देण्यात यावे व रिक्षा वाटपाचा कार्यक्रम दि.०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त करावयाचा असल्यामुळे वेळ कमी आहे. तसेच मा.महासभेने सदरची रिक्षा बजाज फोरस्ट्रोक रिक्षा सी.एन.जी/पेट्रोल वर चालणारी रिक्षा घेण्यासाठी ठराव केलेला आहे. त्यानुसार अधिकृत डिलर रिक्षा बजाज फोरस्ट्रोक डिलर सुरेस व्हिलस यांचेकडे दरपत्रक मागविण्यात आले आहे व भविष्यात निविदा मागविण्यापेक्षा बजाज कंपनी यांच्या अधिकृत डिलरकडून रिक्षा दरपत्रकाप्रमाणे मागविल्यास स्वस्त पडतील व मनपाचा आर्थिक फायदा होईल त्यानुसार त्यांच्या दराप्रमाणे सुरेश व्हिलस, लुईस वाडी, ठाणे(प.) हया अधिकृत डिलरकडून १० रिक्षा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५(२)(२) नुसार खरेदी करण्यास हि सभा मंजुरी देत आहे. व प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी त्वरीत करुन महिला दिन ०८ मार्च च्या पुर्वी रिक्षा आणणे बाबतची त्वरीत कार्यवाही करावी त्यामुळे ०८ मार्च महिला दिना निमित्त रिक्षांचे गरजु महिलांना वाटप करता येईल असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी    अनुमोदन :- श्रीम. मेघना रावल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ११६, **महानगरपालिका सन्मा. पालिका सदस्य व अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.**

सुरेश खण्डेलवालः-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक ऑगस्ट 2017 मध्ये पार पडलेली असुन , निर्वाचीत पालिका सदस्यांमध्ये बहुतांशी पालिका सदस्य प्रथमच निवडून आलेले असल्याने , सदर पालिका सदस्य, अन्य राज्यामधील महानगरपालिकांनी केलेली विवीध विकास कामे , बगीचे, रस्त्यांची माहिती घेणेसाठी तसेच शहरात मुलभुत सुविधा पुरविणे, शहराचा सर्वागीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात नवीन योजना , प्रकल्प राबविणेबाबत अभ्यास करणेसाठी अभ्यास दौरा आयोजित करणेची मागणी करीत आहेत.**

**मेंगलोर - कुर्ग शहरातील रस्ते , बगीचे चांगल्या प्रकारे विकसीत केलेले असुन , शहरात मुलभुत सुविधा, शहराचा सर्वागीण विकास, शहराच्या हिताच्या दृष्टीने नवीन योजना, प्रकल्प राबविले आहेत. मेंगलोर - कुर्ग शहरामध्ये सन्मा. पालिका सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी अभ्यास दौरा आयोजित केल्यास चांगल्या प्रकारची माहिती व ज्ञान अवगत होण्यास मदत होईल.**

**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था , मुंबई यांचेमार्फत् वेळोवेळी अभ्यास दौरे आयोजित करण्यात येत असुन, ही संस्था सदस्यांना उत्तमरित्या प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहे. तसेच सदर संस्था शासनमान्य अधिकृत संस्था आहे . करिता या संस्थे मार्फत उक्त प्रशिक्षण दौरा आयोजित करणे आवश्यक आहे. सदर संस्था अभ्यास दौरा आयोजित करण्यात तयार नसेल तर या कामासाठी ठेकेदाराची नियुक्ती करणे आवश्यक राहिल.**

**तरी महानगरपालिका सन्मा . पालिका सदस्य व अधिकारी /कर्मचारी यांचेसाठी मेंगलोर - कुर्ग येथे अभ्यास दौरा आयोजित करणेसाठी व येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेसाठी स्थायी समिती मंजुरी देत आहे.**

**रवि व्यास :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती महोदय आपण ठराव मंजूर करणारच पण ह्याच्यासाठी किती निधी लागणार.

**मा. सभापती :-**

प्रशिक्षण मंजूर केले आहे तो प्रशासनाचा भाग आहे. कोटेशन ते टेंडर काढतील निविदा काढतील किंवा ऑल इंडियाला कळवतील त्याप्रमाणे त्यांचा जो रेट येईल.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती महोदय ह्या वर्षाचे आपण पण बोललेले की आयुक्ताबरोबर बोलले की ह्या वर्षीचे निधी आपण कसे पण घेऊ या. आमची खूप काम बाकी आहेत. ज्याच्यासाठी मागतो त्याच्यासाठी पैसे नाही. आणि प्रशिक्षणासाठी पैसे आहेत. ठीक आहे तुम्ही करा वांदा नाही पण आमच्या कामाचा निधी आहे तो तरी ॲडजस्ट करून द्या. ते पण करून देत नाही.

**मा. सभापती :-**

ठीक आहे.

**दिप्ती भट :-**

ठीक म्हणजे उत्तर द्या. निधी भेटणार आहे की नाही.

**मा. सभापती :-**

आपण निधी वाढवणार.

**दिप्ती भट :-**

प्रशिक्षण साठी त्यांना पालिकेत बोलवा.

**सुरेश खण्डेलवाल :-**

जे नविन आहेत त्यांना प्रशिक्षणची गरज आहे.

**प्रकरण क्र. ११६ :-**

के प्रस्ताव - **महानगरपालिका सन्मा. पालिका सदस्य व अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.**

ठराव क्र. ९९ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक ऑगस्ट 2017 मध्ये पार पडलेली असुन , निर्वाचीत पालिका सदस्यांमध्ये बहुतां शी पालिका सदस्य प्रथमच निवडून आलेले असल्याने , सदर पालिका सदस्य, अन्य राज्यामधील महानगरपालिकांनी केलेली विवीध विकास कामे , बगीचे, रस्त्यांची माहिती घेणेसाठी तसेच शहरात मुलभुत सुविधा पुरविणे, शहराचा सर्वागीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात नवीन यो जना, प्रकल्प राबविणेबाबत अभ्यास करणेसाठी अभ्यास दौरा आयोजित करणेची मागणी करीत आहेत.**

**मेंगलोर - कुर्ग शहरातील रस्ते , बगीचे चांगल्या प्रकारे विकसीत केलेले असुन , शहरात मुलभुत सुविधा, शहराचा सर्वागीण विकास, शहराच्या हिताच्या दृष्टीने नवीन योजना, प्रकल्प राबविले आहेत. मेंगलोर**

**- कुर्ग शहरामध्ये सन्मा. पालिका सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी अभ्यास दौरा आयोजित केल्यास चांगल्या प्रकारची माहिती व ज्ञान अवगत होण्यास मदत होईल.**

**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था , मुंबई यांचेमार्फत् वेळोवेळी अभ्यास दौरे आयोजित करण्यात येत असुन, ही संस्था सदस्यांना उत्तमरित्या प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहे. तसेच सदर संस्था शासनमान्य अधिकृत संस्था आहे . करिता या संस्थेमार्फत उक्त प्रशिक्षण दौरा आयोजित करणे आवश्यक आहे. सदर संस्था अभ्यास दौरा आयोजित करण्यात तयार नसेल तर या कामासाठी ठे केदाराची नियुक्ती करणे आवश्यक राहिल.**

**तरी महानगरपालिका सन्मा . पालिका सदस्य व अधिकारी /कर्मचारी यांचेसाठी मेंगलोर - कुर्ग येथे अभ्यास दौरा आयोजित करणेसाठी व येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेसाठी स्थायी समिती मंजुरी देत आहे.**

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. रवि व्यास**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

शिक्षण विभागात नविन अधिकारी आले आहेत त्यांची ओळख करून देत आहेत.

**शिक्षण अधिकारी :-**

मा. सभापतीच्या परवानगीने माझा परिचय देतो, माझे नाव भास्कररराव बाबर मी ह्यापूर्वी सहा. शिक्षण संचालक म्हणून औरंगाबाद विभागात कार्यरत होतो. नव्याने ज्या ठिकाणी शिक्षण अधिकारी पदाची वर्ग एक या पदाची पोस्टींग झालेली आहे. मी पहिला शिक्षण अधिकारी म्हणून आपल्याकडे रूजू झालेलो आहे. आपल्या सर्वाच्या संमतीने या विभागाच्या शैक्षणिक विकास करण्याचा मी प्रयत्न करीन.

**जुबेर इनामदार :-**

आपले स्वागत आहे.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, ऑक्टो.२०१७ ते डिसे.२०१७ चा त्रैमासिक जमाखर्च पान क्र. १ सर्वसाधारण कर मालमत्ता कर

**मा. सभापती :-**

साहेब मालमत्ता कराचे १०० कोटीचे बजेट होते.

**शरद बेलवटे :-**

महासभेचे अंदाज १०० करोड होते.

**मा. सभापती :-**

तुमचे प्रत्यक्ष जमा झाले ४२ करोड ५८ करोड पेन्डींग आहे. हे डिसे. पर्यत अंदाज आहेत. जवळ जवळ दोन महिने होऊन गेले.

**जुबेर इनामदार :**

६३ टक्के बाकी आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय माझे एक प्रकरण पेन्डीग आहे. म्हणून मी तुम्हाला फोन केला आणि मा. आयुक्तांना मेसेज पाठवला. जानेवारी माहिण्यात प्रकरण दिले आहे. टॅक्स लागल्यावर त्याच्यावरची शास्ती हटवण्यासंदर्भात योग्य कार्यपध्दत अवलंबून लागलेला जी.आर लावून आर्किटेक्टचे सर्टिफिकेट किती कमी होईल ते सगळे लावून प्रस्ताव प्रभाग क्र. ५ ने ३ जानेवारीला इथे पाठवला. तेव्हापासून मी सातत्याने रिमायन्डर. एस.एम.एस. केले. दोन महिने उलटल्यानंतरी ते प्रकरण निकाली लावण्यात आलेले नाही. कमीत कमी ३.५० लाख रू. च्या मालमत्ताचे देयक त्यांच्याकडून उपलब्ध होऊ शकतो. त्याचे कारण काय का केले जात नाही. अशी किती तरी प्रकरण प्रलंबित असतील. मॅडमना केलेल्या एस.एम.एस चा रेकॉर्ड मी देतो. ६३ टक्के वसूल करायचा अजून बाकी आहे. तुमच्या कडे एक महिना शिल्लक राहिलेला आहे. तुम्हाला सुधारित अंदाजपत्रक देतील तेव्हा दिसेल. कमीत कमी ४० ते ४५ टक्के अर्थसंकल्पामध्ये तफावत असते. मालमत्ता तुमचे एकूण उत्पन्नाचे स्तोत्र ४८ टक्के आस्थापनेचा खर्च गेलेला आहे.

**स्वाती देशपांडे:-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलते. आजपर्यत १०४ कोटी वसूली झालेली आहे. बजेट मध्ये १६४ कोटी प्रयोजित केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मालमत्ता कर १०० कोटी केला होता.

**स्वाती देशपांडे :-**

१०५ कोटी वसूली झालेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

१०० कोटीपेक्षा जास्त झाली.

**स्वाती देशपांडे :-**

हा सामान्य कराचा आकडा आहे.

**जुबेर इनामदार :-**

मी सामान्य कराचेच विचारतो.

**स्वाती देशपांडे :-**

सामान्य कराचे चलन बघून घ्यायला लागेल . मी अपूर्ण वसूली सांगितली आतापर्यत १०५ कोटी वसूली झाली १६४ कोटी डिमांड आहे. १०५ कोटी वसूली झाली.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे तुम्ही ५५ टक्केवर पोहोचलात एक महिना शिल्लक आहे. त्याच्यामध्ये ओपन लॅन्ड टॅक्स वैगेरे सगळेच आहे.

**स्वाती देशपांडे :-**

हा वेगळा विषय

**मा. सभापती :-**

एका महिण्यात अप्रॅाक्सीमेटली किती वसूली होईल. आणि राहिलेल्या वसूलीकरिता आपले प्रोव्हिजन काय आहे. उपाययोजना काय आहे. तुम्ही काय करणार आहात.

**स्वाती देशपांडे :-**

वॉर्ड निहाय सर्व लोक जप्ती करीत आहेत. त्यांच्या मालमत्ताची थकीत रक्कम आलेली नाही. त्यात एमएमसी ॲक्टचे कराधार नियम ४२ ते ४८ नुसार जप्तीची तरतूद आहे. आपण जप्ती देतो.संबधीताना जप्ती सुची, अधिपत्र, वॉरंट देतो आणि त्यानुसार जप्तीची प्रोसेस चालू आहे. ह्याशिवाय काही ठिकाणी नळ कनेक्शन खंडीत केले जात आहे. आपले टॅक्सची लोक घरोघरी जाऊन संबंधीताना अंतिम नोटीस जप्ती वैगेरे देत आहेत. वसूलीची कारवाई चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, एक महिना आपल्याकडे शिल्लक राहिलेला आहे. वसूली परिस्थिती दरवर्षी अशाच प्रकारची असते. आपल्याकडे एक्झॅक्ट डिमांड किती हा तरतूदीचा विषय आहे. अर्थसंकल्पातील तरतूद आहे. डिमांड किती आहे त्याचे आजपर्यत स्पष्टीकरण देऊ शकलात नाही. आपले खरोखर मालमत्ता इतका असताना खरी डिमांड किती आहे. आम्ही १०० कोटीची तरतूद केली. पूढच्या चर्चा सत्रामध्ये १०० कोटीचे १२० ते १२५ करतील खरी परिस्थिती आमच्या समक्ष येऊ द्या. माझी आता तिसरी टर्म आहे. सातत्यानं ह्या विषयावर चर्चा होते. टेक्नीकल सिस्टम असताना सुध्दा डिमांड किती आहे हे निश्चित करू शकलो नाही. प्रशासन खर चित्र समोर आणून द्यायला तयारच नाही.

**सुरेश खण्डेलवाल :-**

मॅडम डिमांड किती आहे. ती काढली असेल ना दरवर्षी आपण जे इन्क्रीज करतो. काहीतरी पॅरामिटर निश्चित केले असेल ना.

**स्वाती देशपांडे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलते, आपल्याकडे कर विभाग हा ऑनलाईन सॉफ्टवेयर आहे त्या नुसारच आपण नोंदणी घेतो. मॅन्यूअली कोणत्याही प्रकारची बिल निघत नाही. किंवा वसूली होत नाही. आपल्याकडे संगणकात जी डिमांड आहे त्या डिमांड मधून सगळ्या वॉर्ड कडून टॅक्स इन्सपेक्टर कडून वसूल न होणरी डिमांड जी आहे त्याचे प्रॉपर्टी नंबर घेतले आणि त्यानूसार त्याची डिमांड कमी वेगळी आणि अशा प्रकारे डिमांड निश्चित करतो.

**जुबेर इनामदार :-**

किती झाली.

**स्वाती देशपांडे :-**

त्यानुसारच मागची डिमांड दिली ना.

**जुबेर इनामदार :-**

ही तर अर्थ संकल्पातील तरतूद आहे. डिमांड कुठे आहे ही स्थायी समितीने केलेली तरतूद आहे. आपल्या महासभेने सुचवली आहे.

**स्वाती देशपांडे :-**

सर अर्थ संकल्पात दरवर्षी मागील १-२ वर्ष किंवा त्याच्याअर्थी आधीच्या अर्थ संकल्पात १० टक्के वाढ ह्या प्रमाणे होती. आपण मागच्या वर्षीचे ह्या वर्षीचे आणि २०१८-१९ चे हे तिन्ही ऑब्जर्वेशन केले तर लक्षात येईल की १० टक्के वाढ सरसकट दिलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हे तुम्हाला समाधानकारक उत्तर वाटले का? हे १० टक्के वाढ ही नेचर वाढ त्यांनी सांगितली. नैसर्गिक वाढ झाली. फिगरमध्ये सांगा १००,१२५,,९०,७० कोटी आहे. ॲक्चूअल डिमांड किती आहे.

**स्वाती देशपांडे :-**

टोटल डिमांड २०३-२१० कोटी आहे. त्यातील वसूल न होणारी रक्कम ८६ ते ८८ कोटी आहे. त्यानंतर उरलेली रक्कम ही आपली जी आपण बजेट मध्ये देतो. जी डिमांड आहे टॅक्स विभागाची ती आहे . तुम्हाला १०-१५ मिनिटात क्लियर आकडेवारी देते.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही एकत्र १६५ कोटीच बोललात.

**स्वाती देशपांडे :-**

वसूल न होणारी थकीत रक्कम आपण मायनस करतो. वर्षानुवर्षे इथे मिरा भाईदर महानगरपालिकेचे कूठल्याही प्रकारचे निर्लेखनाचे प्रकरण निकाली लागले नाहीत. स्टॅन्डिगमध्ये मागे प्रपोजल दिले होते. त्याच्यावर निर्णय देखील झाला नव्हता. त्यामूळे सध्यस्थितीत वसूल न होणारी जी प्रॉपर्टी आहे त्याचे प्रॉपर्टी नंबर कलेक्ट करून त्याची डिमांड आपण वेगळी करतो. त्याच्यानुसार जी डिमांड आहे ती बजेटला देतो.

**जुबेर इनामदार :-**

मा.सभापती महोदय अर्थसंकल्पावर चर्चा सत्र सूरु करायच्या आधी आपण कर विभागाला सुचना करा हा तक्ता आम्हाला तयार करून द्या. डिमांड,निर्लिखीत करायला आलेले अर्ज, थकीत किती आहे. त्याच्यामध्ये रहीवासी आणि निवासी बिगर निवासी तुमच्याकडे प्रलंबित प्रकरण किती आहेत. ज्यांना टॅक्स लावायचा बाकी आहे त्या अनुषंगाने पूढचा अर्थ संकल्प तयार करायला सोपे होईल आज परिस्थिती अशी आहे की आम्ही हॅन्ड टू माऊथ आहोत.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय ह्या विषयावर पूर्ण तक्ता तयार करून बजेटवर चर्चा करू. त्यावेळी हा तक्ता द्यायला सांगा.

**मा. सभापती :-**

देशपांडे मॅडम ह्या व्यतिरिक्त शहरामध्ये किती प्रॉपर्टी आहेत ज्यांना आपण अजून टॅक्स लावला नाही आणि आपली भुमिका काय? ह्यांना आपण सर्वेक्षण करून टॅक्स लावणार आहेत का? ह्याचा आढावा घ्या. आणि येणा-या चर्चेमध्ये तुमचा इम्पोॅटन्ट विषय असणार कारण की महानगपालिकेचे आर्थिक बजेट अवलंबून आहे. तुम्हाला ५-६ दिवस देतो.

**सुरेश खण्डेलवाल :-**

मॅडम ज्या डीटेल बोलल्या ना ८० करोड जे नॉन रिसिव्हर जे येणारच नाहीत त्यांना ते दरवर्षी कॅरी फॉरवर्ड करून शास्तीची भरपूर रक्कम पेन्डीग आहे अशा प्रकरणाची लिस्ट बनवून ते निकाली लावू. माझे निवेदन आहे ८० करोड दरवर्षी बजेटमध्ये येणार नाही तर त्याचा निकाल घेऊ.

**मा. सभापती :-**

मोकळ्या जागेवर कर

**प्रशांत दळवी :-**

साहेब आपण ह्या विषयावर विचारणार त्यांच्याकडे काही माहिती नसणार माझी रिक्वेस्ट आहे बजेटला २-३ दिवस लागणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय दूसरा एक विषय होता. निर्लेखीत करायचा जो विषय आहे तो स्थायी समिती समोर आणवा लागणार आहे. आजपर्यंत आलेला नाही.

**सय्यद नुरजहॉ नजर हूसैन :-**

हे तुम्हाला मान्य आहे का? आज मिटीग होती तर ह्यांच्याकडे सर्व कागद पाहिजे होते ना ते सांगा.

**मा. सभापती :-**

आपल्या सिनियर कॉर्पोरेटर मम्मीनी व्यवस्थीत आणि मुद्देसूद मांडले आहे की तुमच्याकडे सर्व डिटेल रेडी असले पाहिजेत निर्लेखीताची अमाऊन्ट किती कारण वर्षानूवर्षे ही प्रकरण पेन्डीग होत जातात.

**स्वाती देशपांडे :-**

साहेब निर्लेखीत प्रकरणाची यादी आहे. माझ्याकडे डिमांड टोटल संगणकात किती आहे ती माहिती आहे.वसूल न होणारी रक्कम किती आहे त्याची पण माहिती आहे. आणि ॲक्चूअल डिमांड किती आहे त्याची पण माहिती आहे.

**प्रशांत दळवी :-**

तुम्ही स्थायीला सादर केले आहे का?

**मा. सभापती :-**

का करत नाही.

**स्वाती देशपांडे :-**

उल्हासनगरहून आणि २-३ महानगरपालिकाचे फॉर्मेट मागवले आहे की कशाप्रकारे आपण निर्लेखणसाठी स्थायी समितीकडे सादर करू. त्यानुसार एक प्रतिज्ञापत्र एक पंचनामा आणि आमच्या विभागाचा पाहणी अहवाल ३-४ फॉर्मेट आम्ही दिला आहे. त्यानुसार विविध पध्दतीने प्रकरण सादर करु.

**दिप्ती भट :-**

मॅडम सादर करणारा बरोबर आहे. किती पर्सेन्टेज कमी करणार.

सुरेश खण्डेलवाल :-

तो आपला अधिकार आहे. ते सादर करतील मग आपण काय डिसीजन घ्यायचा तो घेऊ.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय माझी रिक्वेस्ट आहे.स्थानीक संस्था कर, मुद्रांक शुल्क करमणूक, कर प्रदर्शन कर,कोंडवाडं हे जे हेड आहेत. ह्या हेड आहेत ह्या हेड अन्वये ज्यांनी माहिती द्यायची त्याच्याकडे ही माहिती उपलब्ध नसणार. मला असे म्हणायचे आहे ह्याची प्रॉपर तयारी करा.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती महोदय ही चर्चा बजेटवर होणार आहे.

**सुरेश खंण्डेलवाल :-**

मा. सभापती महोदय ही चर्चा पून्हा बजेटवर होणार आहे.

**सुरेश खण्डेलवाल :-**

ही चर्चा जानेवारीमध्ये झाली पाहिजे होती.

**मा. सभापती :-**

प्रत्येक विभागाला आदेश काढा की प्रत्येक शिर्षकाप्रमाणे त्याची तरतूद किती होती. किती जमा केली किती उरलेली आहे. आणि हे का उरलेले आहेत. त्याचा सर्व लेखाजोखा रेडी ठेवावा. त्याच्यावर डिटेलमध्ये चर्चा होणार. मग असे नाही पाहिजे की आमची माहिती घ्यायची बाकी आहे. तसे व्हायला नको. साहेब सगळ्यांना आदेश काढा.

**प्रकरण क्र. १११ :-**

**माहे ऑक्टोबर-२०१७ ते माहे डिसेंबर-२०१७ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत. (दि. १४/०२/२०१८ रोजीचे प्रलंबित प्रकरण क्र. ८९)**

**ठराव क्र. ९४ :-**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर - २०१७ ते डिसेंबर - २०१७ त्रैमासिक जमा/खर्च तसेच आग सुरक्षा निधी जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर अवलोकनाकरिता सादर करण्यांत आलेला आहे.

सदरच्या स्थायी समितीमध्ये माहे ऑक्टोबर - २०१७ ते डिसेंबर - २०१७ त्रैमासिक जमा/खर्च तसेच आग सुरक्षा निधी जमा/खर्चाचे अवलोकन करण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपण्याची वेळ १२.०५ वाजता.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका